## ढिगाऱ्याखाली लोकांचा शोध सुरूच

■ **वृत्तसंस्था, डेहराडून, दि. ९ :**
उत्तराखंडमध्ये ५ ऑगस्ट रोजी झालेल्या ढगफुटीनंतर, पुरामुळे हर्षिलमध्ये एक तलाव तयार झाला आहे. त्याच वेळी, धराली गावात ढिगाऱ्याखाली दबलेल्या लोकांचा शोध घेण्याचे काम सुरू झाले आहे.

यासाठी, सैन्य प्रगत भेदक रडार वापरत आहे. याच्या मदतीने, जमिनीत गाडलेले लोक खोदल्याशिवाय शोधता येतात. भेदक रडार जमिनीखाली उच्च वारंवारता रेडिओ लहरी पाठवते, जिथे ते वेगवेगळ्या रंगांद्वारे माती, दगड, धातू आणि हाडे शोधते. ५ ऑगस्ट रोजी दुपारी १.४५ वाजता उत्तरकाशी जिल्ह्यातील धराली येथे ढगफुटी झाली. खीर गंगा नदीला आलेल्या पुरामुळे ३४ सेकंदात धराली गाव जमीनदोस्त झाले.


नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com








* वर्ष ५१ * अंक ४० * * अमरावती * रविवार, दिनांक १० ऑगस्ट २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


## थोडक्यात

### ऑपरेशन सिंदूरमध्ये ५ पाकी विमाने पाडली



■ **बंगळुरू :** भारतीय हवाई दलाचे प्रमुख एपी सिंह यांनी शनिवारी सांगितले की, ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्तानचे मोठे नुकसान झाले. आम्ही त्यांची पाच लढाऊ विमाने पाडली. एपी सिंह यांनी बंगळुरू येथे एका कार्यक्रमात याची पुष्टी केली. एअर चीफ मार्शल एपी सिंह म्हणाले, आमच्या हवाई संरक्षण यंत्रणेने उत्तम काम केले आहे. आम्ही अलीकडेच खरेदी केलेली एस-४०० प्रणाली गेम-चेंजर ठरली आहे. पाकिस्तानकडे लांब पल्ल्याचे ग्लाइड बॉम्ब होते पण ते त्यापैकी एकही वापरू शकले नाहीत कारण ते हवाई संरक्षणात भेदक होऊ शकत नव्हते. एपी सिंह बंगळुरूमधील एचएएल मॅनेजमेंट अकादमी सभागृहात एअर चीफ मार्शल एलएम कात्रे मेमोरियल लेक्चरच्या १६ व्या हंगामात बोलत होते.

### महाकाल व बाबा विश्वनाथ यांना बांधली राखी



■ **नवी दिल्ली :** आज देशभरात रक्षाबंधन सण साजरा केला जात आहे. श्रावण महिन्यात काशीमध्ये मंगला आरतीनंतर बाबा विश्वनाथांना रेशमी राखी बांधण्यात आली.
उज्जैनमधील महाकालेश्वर मंदिरात महाकालला राखी बांधण्यात आली. अमर पुजारीच्या कुटुंबातील महिलांनी तयार केलेली एक खास राखी त्यांना अर्पण करण्यात आली.
अयोध्येत, भगवान रामलल्ला आणि त्यांच्या भावांसाठी शृंगी धाम येथून राख्या आणण्यात आल्या. पंतप्रधान मोदींनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या.

### रेपच्या आरोपीने केली वकिलाची हत्या

■ **झाशी :** खटला लढवणाऱ्या वकिलाची त्याच्याच एका पक्षकाराने हत्या केली. वकील माझा खटला लढवत होता. ज्या मुलीसोबत मी एकत्र जगण्याची आणि मरण्याची शपथ घेतली होती, जिच्याशी मी लग्न करणार होतो, तिच्यावर बलात्कार केल्याबद्दल मला दोषी ठरवण्यात येणार होते. वकिलाने माझ्याकडून खूप पैसे घेतले. पण त्याने माझा खटला नीट लढवला नाही. म्हणूनच मी त्याला मारले, अशी कबुली आरोपीने दिले. भान प्रकाश सिरवारिया असे खून झालेल्या वकिलाचे नाव आहे तर सचिन वर्मा असे आरोपीचे नाव आहे. अ‍ॅड. भान प्रकाश झाशी न्यायालयात सचिनची बाजू मांडत होते.

## मतचोरीसंबंधी राहुल गांधींच्या आरोपांना

# शरद पवारांचे समर्थन

### निवडणूक आयोगाने गहू, भुसा वेगळा करावा : मुख्यमंत्र्यांवरही हल्लाबोल

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केलेल्या निवडणूक हेराफेरीच्या आरोपांचे शनिवारी जोरदार समर्थन केले. ते म्हणाले की, राहुल गांधी यांच्या आरोपांमध्ये तथ्य आहे. निवडणूक आयोगाने यावर स्पष्टीकरण द्यावे. या प्रकरणात राहुल गांधींवर प्रतिज्ञापत्र देण्यासाठी दबाव आणणे आयोगाला अजिबात योग्य नाही असे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही हल्लाबोल केला.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची मंडळ यात्रा शनिवारी शरद पवार यांच्या उपस्थितीत सुरू झाली. यात्रेपूर्वी पवार यांनी पत्रकारांशी संवाद साधला. जिथे त्यांनी महाराष्ट्र निवडणुकीसह विविध मुद्द्यांवर पत्रकारांशी संवाद साधला. निवडणूक हेराफेरीच्या मुद्द्यावर राहुल गांधी यांनी घेतलेल्या सातत्यपूर्ण भूमिकेचे शरद पवार यांनी जोरदार समर्थन केले.

शरद पवार म्हणाले की, जेव्हा विधानसभा निवडणुका जाहीर झाल्या तेव्हा काही लोक दिल्लीत मला भेटायला आले. तिथे दोन लोक होते. सध्या माझ्याकडे त्यांची नावे आणि पत्ते नाहीत. त्यांनी मला त्या दिल्याही नाहीत. ते म्हणाले, महाराष्ट्र विधानसभेत २८८ जागा आहेत. आम्ही तुम्हाला हमी देतो की आम्ही १६० जागा जिंकू. पण त्यावेळी मला निवडणूक आयोगाबद्दल शंका नव्हती. म्हणून मी त्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले कारण मी नेहमीच अशा लोकांना भेटत राहतो.



> **निवडणूक आयोगाचा शपथपत्राचा आग्रह चुकीचा**
> राहुल गांधींनी बनावट मतदानाची अनेक उदाहरणे दिली. त्यांनी केवळ उदाहरणेच दिली नाहीत तर त्याचा आधारही स्पष्ट केला. पण आज असे दिसते की निवडणूक आयोगाने त्याचा वेगळा अर्थ लावण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांनी राहुल गांधींना चर्चेसाठी आमंत्रित केले. पण चर्चा करताना त्यांनी प्रतिज्ञापत्र देण्याची अट घातली. निवडणूक आयोग ही एक स्वतंत्र संस्था आहे. राहुल गांधी म्हणाले की मी खासदार होताच शपथ घेतली. त्यामुळे आता शपथ घेण्याची गरज नाही. त्यामुळे निवडणूक आयोगाचा प्रतिज्ञापत्र मागण्याचा आग्रह योग्य नाही, असे पवार म्हणाले.

यानंतर मी त्या लोकांमध्ये आणि राहुल गांधींमध्ये बैठक आयोजित केली. त्यांनी राहुल गांधींसमोर आपला मुद्दा मांडला. मी जनतेच्या दरबारात जाण्याचे नाटक करून या प्रकरणाकडे दुर्लक्ष केले. पण काल राहुल गांधींनी दिल्लीत पत्रकार परिषद घेतली. खूप मेहनत आणि यशस्वी अभ्यासानंतर ते सादर करण्यात आले.

राहुल गांधी यांनी दिलेल्या सादरीकरणाची सखोल चौकशी झाली पाहिजे. संवैधानिक लोकशाहीबद्दल लोकांच्या मनात शंका निर्माण करणे योग्य नाही. त्यामुळे त्याची सखोल चौकशी झाली पाहिजे. शरद पवार म्हणाले, सत्य समोर यावे अशी आमची विनंती आहे.

**आयोगाने उत्तर द्यावे**

मतदार याद्यांमधील तफावतीबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केलेली भूमिकाही शरद पवार यांनी फेटाळून लावली. पवार म्हणाले, माझा एकमेव मुद्दा हा आहे की कोणाला आक्षेप आहे? आम्हाला मुख्यमंत्र्यांवर कोणताही आक्षेप नाही. आमचा आयोगावर आक्षेप आहे.

त्यामुळे निवडणूक आयोगावर आक्षेप घेतल्यानंतर, भाजप किंवा मुख्यमंत्र्यांनी त्यांचे मत व्यक्त करण्यासाठी पुढे येण्याची गरज नाही. आम्हाला निवडणूक आयोगाकडून उत्तर हवे आहे, इतर कोणाकडून नाही. आम्ही निष्क्रिय बसणार नाही. आम्हाला निर्णय घ्यावा लागेल. जर आमची माहिती चुकीची असेल तर आम्ही देशाला सांगावे. पण जर नसेल तर जे काही सत्य आहे ते बाहेर आणावे, असेही शरद पवार यावेळी म्हणाले. याप्रसंगी प्रदेशाध्यक्ष शशीकांत शिंदे, अनिल देशमुख, आमदार रोहित पवार, जितेंद्र आव्हाड, सलिल देशमुख, प्रकाश गजभिये, राजेंद्र शिंगणे, उपस्थित होते.

## ३ दहशतवादी ठार २ जवान शहीद

■ **वृत्तसंस्था, कुलगाम, दि. ९ :**
जम्मू-काश्मीरमधील कुलगामच्या अखल जंगलात सुरक्षा दलांनी आणखी एका दहशतवाद्याला ठार मारले. १ ऑगस्टपासून सुरू असलेल्या कारवाईचा आज नववा दिवस आहे. आतापर्यंत ३ दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात आला आहे.

शुक्रवारी रात्रीपासून सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये गोळीबार सुरू होता. यामध्ये चार सैनिक जखमी झाले. लान्स नाईक प्रितपाल सिंग आणि शिपाई हरमिंदर सिंग हे दोन सैनिक शहीद झाले.

२ ऑगस्ट रोजी सकाळी सुरक्षा दलांनी दोन दहशतवाद्यांना ठार केले. एका दहशतवाद्याची ओळख पुलवामा येथील हरिस नजीर दार म्हणून झाली, जो सी-श्रेणीचा दहशतवादी होता. पहलगाम हल्ल्यानंतर २६ एप्रिल रोजी गुप्तचर संस्थांनी ज्या १४ स्थानिक दहशतवाद्यांची नावे जाहीर केली होती, त्यात हरीसचा समावेश होता. त्याच्याकडून एके-४७ रायफल, मॅगझिन, ग्रेनेड आणि दारूगोळा जप्त करण्यात आला होता.

'ऑपरेशन अखल' हे स्पेशल ऑपरेशन्स ग्रुप, जम्मू आणि काश्मीर पोलिस, लष्कर आणि सीआरपीएफ यांच्याकडून राबवले जात आहे. जंगलात आणखी दहशतवादी लपले असण्याची शक्यता आहे.

### नवनीत राणांना धमकी देणाऱ्याला अटक

■ **महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. ९ :**
भाजपच्या नेत्या आणि माजी खासदार नवनीत राणा यांना समाज माध्यमावरून अश्लील शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी देणाऱ्या तरूणाला हुडकून काढण्यात अमरावती पोलिसांना यश आले.
शेख इसा शेख मुसा (२८, रा. पथ्रोट, जि. अमरावती) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याचा भाऊ शेख मुस्ताक (३२, रा. पथ्रोट), भावसासरा मो. जाकीर शेख हसन (३७), एजाज खान अहमद खान (२४, रा. पथ्रोट) आणि जुबेर सुलतान सौदागर (२१, रा. तरोडा रिद्धपूर) यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

## इतके दिवस गप्प का?

### राहुल गांधी भेटले आणि वाणीला उधाण! फडणवीसांचा बाण

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ९ :**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांच्यावर टोकाची टीका केली असून, त्यांच्या अचानक वाढलेल्या राजकीय सक्रियतेवर प्रश्नचिन्ह उभे केले आहे.

इतके दिवस पवार साहेब शांत होते, काही बोलले नाहीत... आणि राहुल गांधींशी भेट झाल्यानंतर अचानक का बोलू लागले? असा थेट सवाल फडणवीसांनी उपस्थित केला. ते म्हणाले, बॉलिवूडमध्ये सलीम-जावेद यांनी अनेक जबरदस्त कथा लिहिल्या. आज राहुल गांधी देखील अगदी तशीच स्टोरी बनवत आहेत, ज्यात पवार साहेब अचानक एंट्री मारतात! या तुलना ऐकून राजकीय पत्रकारांमध्ये हशा पिकला.

भाजप आमदार संजय शिरसाठ यांनी देखील पवार यांच्यावर निशाणा साधत विचारले. जर निवडणूक प्रक्रियेत काहीतरी चूक झाली असेल, तर मग निवडून आलेले नेते चुकीचे का नाहीत? की हा मुद्दा फक्त आपल्या सोयीनुसार काढला जातो?

**पवारांच्या गप्पीचा राजकीय अर्थ**

राजकीय विश्लेषकांच्या मते, शरद पवार यांची इतक्या दिवसांची शांतता आणि आता अचानक झालेला पॉलिटिकल अ‍ॅक्टिव्ह मोड यामागे अनेक गणिते दडलेली असू शकतात. राहुल गांधींची भेट, आगामी निवडणुका आणि महाराष्ट्रातील बदलते समीकरण या तिन्हींचा संगम आता राजकीय गोटात नवी चर्चा पेटवत आहे.

येत्या काही दिवसांत शरद पवार साहेब या चर्चेवर काय भूमिका घेतात, हे पाहण्यासाठी राजकीय वर्तुळात काउंटडाउन सुरू झालं आहे. एक मात्र निश्चित, महाराष्ट्राचं राजकारण आता पुन्हा हाय व्होल्टेज मोडमध्ये जाणार!

### रक्षाबंधनाच्या दिवशी दोन घटनांमध्ये

## दोन भावांचा दुर्दैवी मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. ९ :**
सलग दोन दिवस झालेल्या अपघातामुळे जिल्ह्यात शोककळा पसरली असतानाच रक्षाबंधनाच्या दिवशी घडलेल्या दोन विविध घटनांमध्ये दोन भावांना जीव गमवावा लागल्याने मृतांच्या कुटुंबीयांना धक्का बसला आहे.
पहिल्या घटनेत महावितरण कंपनीत सहायक अभियंता पदावर कार्यरत दलसू कटिया नरोटे (वय ३७) यांचा कारमपल्ली गावाजवळच्या नाल्यात बुडून मृत्यू झाला. तर सिरोंचाकडे जात असताना रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रॅक्टर ट्रॉलीला धडक दिल्याने मोटारसायकलवरील ८ वर्षीय बालकाचा मृत्यू झाला. तर वडील आणि आई जखमी झाले. दोघेही मृत रक्षाबंधनासाठी गावाकडे आले होते.

एटापल्ली तालुक्यातील कारमपल्ली येथील मूळ रहिवासी व नांदेड जिल्ह्यातील मुखेड येथे दलसू नरोटे हे सुट्या घेऊन जागतिक आदिवासी दिन व रक्षाबंधनासाठी पत्नी व दोन मुलांना घेऊन ७ ऑगस्टला मुलचेरा तालुक्यातील पुल्लीगुडम या आपल्या सासुरवाडीला गेले. दुसऱ्या दिवशी ते कारमपल्लीला गेले. तेथे शेतात धान रोवणी सुरु असल्याने ते शेतावर गेले. काही वेळाने ते जवळच्या नाल्यावर गेले. मात्र, मिरगी आल्याने ते नाल्यात पडले. त्यातच त्यांचा मृत्यू झाला.

**रक्षाबंधनासाठी जात असताना अपघात**

असरअली येथील संतोष कोकू हे पत्नी व मुलाला घेऊन मोटारसायकलने सिरोंचा येथे रक्षाबंधनासाठी जात होते. अंकिसा येथे पोहचताच गावात रामकृष्ण चिरला यांच्या ट्रॅक्टर ट्रॉलीला मोटारसायकल धडकली. यात शौर्यचा जागीच मृत्यू झाला. संतोष कोकू यांचा डावा हात आणि पाय मोडला, तर सौंदर्या कोकू किरकोळ जखमी झाल्या.



■ **नागपूर :** आज देशभरात रक्षाबंधनाचा सण साजरा करण्यात आला. बहिणींनी आपल्या भावाला औक्षण करून राख्या बांधल्या. राजकीय नेत्यांच्या कुटुंबातही राखीचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना त्यांच्या भगिणीने राखी बांधली.
काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांच्या कुटुंबात त्यांच्या मुलीने आपल्या पित्याला राखी बांधली.

### मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना पाच वर्षे सुरूच राहणार : सीएम

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :**
मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना आम्ही सुरू केली. विरोधकांनी आधी याबाबत मोठी वावटळ उठवली. हे भाऊ निवडणुकीपुरतेच पैसे देणार आहेत. नंतर हे पैसे बंद करतील असा अपप्रचार करण्यात आला. पण मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना आम्ही सुरूच ठेवली. इतकेच नाही तर ती पुढचे पाच वर्ष सुरूच राहणार आहे. योग्यवेळी या योजनेच्या निधीत आम्ही वाढही करणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. रक्षाबंधनानिमित्त लाडक्या बहिणीस भेट या कार्यक्रमात ते बोलत होते.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेमार्फत पात्र महिलेस दरमहा १५०० रुपए देण्यात येतात. राज्याच्या अर्थव्यवस्थेवर या योजनेचा मोठा बोजा पडत असून ही योजना बंद करण्यात येणार असल्याचा दावा विरोधकांकडून अनेकदा करण्यात येत असतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांचा हा दावा पूर्णपणे रददबातल तर केला आहेच. पण या योजनेच्या निधीत योग्यवेळी वाढ करणार असल्याची ग्वाही देखील त्यांनी दिली आहे.

### साखरखेर्डा, पांढरदेवमध्ये ढगफुटीसदृश पाऊस

■ **बुलढाणा, दि. ९ :**
सिंदखेडराजा तालुक्यातील साखरखेर्डा परिसर आणि चिखली तालुक्यातील पांढरदेव गावात ९ ऑगस्ट रोजी ढगफुटी सदृश पाऊस झाला. साखरखेरड्यात सिद्धेश्वर मंदिर बुडाले. शेतांना तलावाचे स्वरूप प्राप्त झाल्याने खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

साखरखेर्डा परिसरात सोयाबीन, कपाशी, हळद अक्षरशः पाण्याखाली गेल्याने शेतकरी हैराण झाला आहे.आठवडाभराची उसंत घेऊन पुन्हा पावसाने जोरदार हजेरी लावल्याने भोगावती नदी दुथडी भरून वाहत आहे. भोगावती नदीकाठी असलेल्या सर्व शेतांमध्ये सर्वत्र पाणीच पाणी झाले असून शेतकरी हवालदिल झाले आहेत. रक्षाबंधनाला होणारी कुस्त्यांची दंगलही स्थगित करण्यात आली.

### ताई सकाळी राखी बांध, गिफ्ट देईन गं...

# निष्प्राण हातावर बांधावी लागली राखी

■ **महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. ९ :**
रक्षाबंधनाचा आदला दिवस... वारंवार आपला हात पुढे करीत तो बहिणीला म्हणायचा... ताई, सकाळीच राखी बांध गं, मग मी तुला गिफ्ट देईन... होरे बाबा... म्हणून ती बहिणही लाडीवाळपणे त्याचा मुका घ्यायची...
पण, त्या बिचारीला काय ठावूक की? नियतीच्या मनात काहीतरी वेगळेच असावे. रक्षाबंधनाचा सण सर्वत्र साजरा होत होता, बहिणी आपल्या भावांना ओवाळून राखी बांधत होत्या आणि... त्या घरी मात्र आक्रोश... त्याच्या निपचित पडलेल्या देहाजवळ उभी राहून बहिणीला त्याच्या निष्प्राण हाताला राखी बांधावी लागली.

नाशिक जिल्ह्यातील वडनेर गावात रक्षाबंधनाच्या एक दिवस आधी हृदय पिळवटून टाकणारी घटना घडली. गावातील तीन वर्षांचा आयुष भगत याचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला. आयुषची दहा वर्षांची बहीण श्रेयाने अंत्यसंस्कार करण्यापूर्वी भावाच्या मनगटावर राखी बांधून त्याला अखेरचा निरोप दिला. हे दृश्य पाहून उपस्थित प्रत्येकाचे मन हेलावून गेले. ग्रामस्थांनी जड अंतकरणानं चिमुकल्या आयुषला अखेरचा निरोप दिला.



किरण भगत यांचे कुटुंब वडनेर परिसरात वास्तव्यास असून, शेताजनीकच त्यांचे घर आहे. त्यांना श्रेया आणि आयुष अशी दोन मुले आहेत. रक्षाबंधनाच्या आदल्या दिवशी शुक्रवारी रात्री ९ वाजता मळ्यात खेळायला गेलेल्या आयुषवर बिबट्याने हल्ला केला. त्यानंतर तो मुलाला ओढत शेतात घेऊन गेला. जेवणासाठी वडिलांनी आयुषला हाक मारली, पण त्याचा प्रतिसाद मिळाला नाही. मुलगा दिसत नसल्याने कुटुंबीय आणि ग्रामस्थांनी शोधमोहीम सुरू केली.

जवळपास तीन तास सुरू असलेल्या शोधामध्ये ग्रामस्थांसह वन विभाग, श्वानपथक आणि पोलिसांचा सहभाग होता. अखेर रात्री पावणे बारा वाजता ऊसाच्या शेतात रक्तबंबाळ अवस्थेत आयुषचा मृतदेह आढळला.

आयुषच्या निधनाने त्याच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. 'ताई, तू मला सकाळी राखी बांध, मी तुला गिफ्ट देईन' असे आयुषने रक्षाबंधनाच्या आदल्या दिवशी बहिणीला सांगितले होते. परंतु त्या आधीच तो कायमचा दूर गेला. तरीही, बहिणीने त्याची शेवटची इच्छा पूर्ण केली.
श्रेयाने अंत्यसंस्कारापूर्वी आयुषच्या निष्प्राण मनगटावर राखी बांधली. राखी बांधताना तिच्या डोळ्यांतून अश्रूंचा बांध फुटला आणि पाहणारा प्रत्येक जण हेलावून गेला. यावेळी श्रेयाचा आक्रोश पाहून ग्रामस्थांना डोळ्यांतले पाणी थांबवणे अशक्य झाले.

श्रेया रात्रभर भावाच्या आठवणीत रडत होती, तर संपूर्ण वडनेर गाव या दुःखद घटनेने स्तब्ध झाला होता. रक्षाबंधनाच्या दिवशी गोड आठवणींऐवजी अश्रूंची राखी आणि चिमुकल्याचा अकाली मृत्यू ही कायमची जखम बनून राहिली. प्रत्येकजण या घटनेने हळहळला होता.



■ **नागपूर :** आदिवासी दिनाचे औचित्य साधून शनिवारी नागपूर शहरात आदिवासी समुदायाच्या विविध संघटनांच्यावतिने अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, त्याचाच एक भाग म्हणून आदिवासी युवक युवतींनी सुरेख नृत्य सादर केले.

# मंत्रालयात १५ ऑगस्टपासून ऑफलाइन पास बंद

## डीजी ॲप नोंदणीनंतरच प्रवेश : विधिमंडळातही फेस रेकग्निशन सिस्टिम बसवण्याची तयारी

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ९ :

राज्यातील विविध भागांतून मंत्रालयात कामासाठी येणाऱ्या नागरिकांना (अभ्यागतांना) येत्या १५ ऑगस्टपासून ऑफलाइन पास बंद करण्यात येणार आहेत. नागरिकांना प्रवेशासाठी डीजी ॲपवरच नोंदणी बंधनकारक आहे. त्यानंतरच मंत्रालयात प्रवेश मिळणार आहे. मंत्रालयात प्रवेश करण्यासाठी गार्डन गेटजवळील १० खिडक्यांवर ऑफलाइन पास दिले जात होते. मात्र, १५ ऑगस्टपासून खिडक्यांवरील ऑफलाइन पास देणे बंद करण्यात येणार आहेत.



कामानिमित्त मंत्रालयात येणाऱ्यांची गर्दी लक्षात घेता गर्दीवर नियंत्रण मिळवण्यासाठी राज्य शासनाने फेस डिटेक्शन व डीजी प्रवेश ॲप प्रणाली अमलात आणली आहे. या दोन्ही प्रणालींमुळे मंत्रालयातील गर्दीवर नियंत्रण मिळवणे शक्य झाले आहे. डीजी ॲप मुळे मंत्रालयाची सुरक्षा, अभ्यागतांच्या वेळेची बचत, तासन्तास रांगेत उभे राहण्याची कटकट दूर होणार आहे. मंत्रालयाच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून हा निर्णय घेण्यात आल्याचे गृह विभागाच्या अधिकाऱ्याने सांगितले.

पावसाळी अधिवेशनात विधान भवनाच्या लॉबीत झालेला गोंधळ आणि हाणामारीनंतर आता विधान भवनाच्या सुरक्षेत तांत्रिक बदल घडवून आणण्याची हालचाल सुरू झाली आहे.

विशेष अधिकार समितीने याबाबत आढावा घेतला असून मंत्रालयाप्रमाणे विधान भवनातही फेस रेकग्निशन सिस्टिम बसवण्याची शक्यता तपासली जात आहे. विधान भवनातील शिस्त आणि सुरक्षितता अधिक काटेकोर करण्याच्या दृष्टीने पावले उचलली जात आहेत. अधिवेशनादरम्यान आमदार गोपीचंद पडळकर आणि जितेंद्र आव्हाड यांच्या कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या हाणामारीच्या घटनेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी कठोर नियमावलीची तयारी सुरू आहे. विशेष अधिकार समितीने विधान भवन सुरक्षा यंत्रणेला फेस रेकग्निशन सिस्टिमबाबतचा सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

डीजी प्रवेश ॲप हे मोबाइल ॲप अँड्रॉइड आणि आयओएस ॲपल या दोन्ही प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात आले आहे. आपल्या मोबाइलच्या प्रणालीनुसार अँड्रॉइडमध्ये प्ले स्टोअरवर तर आयओएस ॲपलवर ॲपल स्टोअरवर सर्च केल्यास हे ॲप विनामूल्य डाऊनलोड करता येते. या ॲपवर सुरुवातीला केवळ एकदाच नोंदणी करणे आवश्यक राहील. नोंदणी झाल्यानंतर आधार क्रमांकावर आधारित यंत्रणेद्वारे छायाचित्राची ओळख पटवून नोंदणी पूर्ण केल्यानंतर ज्या विभागात काम आहे त्याचा स्लॉट बुक करून रांगेशिवाय प्रवेश मिळतो. या संपूर्ण प्रक्रियेला तीन मिनिटांपेक्षा कमी कालावधी लागतो.

## सासरच्या छळाला कंटाळून महिलेची आत्महत्या

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ९ :

फुरसुंगी, हडपसर येथे सासरच्या सततच्या छळाला कंटाळून २४ वर्षीय सीमा अक्षय राखपसरे या महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी पती अक्षय सुरेश राखपसरे, सासू आशाबाई सुरेश राखपसरे आणि चुलत सासरे यांच्यासह अन्य नातेवाईकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रवी खलसे (५०) यांनी फुरसुंगी पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, सीमा आणि अक्षय यांचा काही महिन्यांपूर्वीच विवाह झाला होता. विवाहानंतर सीमाकडे माहेरहून पैसे आणण्याची मागणी करण्यात आली होती. तिला सातत्याने टोमणे मारून शारीरिक आणि मानसिक छळ करण्यात येत होता. या त्रासाला कंटाळून सीमाने राहत्या घरात पंख्याला ओढणी बांधून आत्महत्या केली.पोलीस उपनिरीक्षक बापूसाहेब खंदारे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. याचबरोबर लोणी काळभोर भागात कामावरून काढून टाकण्याच्या धमकीमुळे तुकाराम ज्ञानेश्वर भाले (३८) या व्यक्तीने गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी सुनील विजय कसबे (३२), करण सोमनाथ कसबे (२२) आणि अक्षय रामजीत केवट (३०) या तिघांना अटक करण्यात आली आहे. भाले यांच्या पत्नीने दिलेल्या फिर्यादीनुसार, आरोपी त्यांना सतत शिवीगाळ करत असत आणि कामावरून काढून टाकण्याची धमकी देत असत.

## भाजपच्या कार्यालयातून चालतो निवडणूक आयोग

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ९ :



शरद पवारांच्या गौप्यस्फोटाला आदित्य ठाकरेंचे समर्थन

विधानसभा निवडणुकीतील मतांची चोरी आणि निवडणूक आयोगावरच्या पक्षपातीपणाच्या आरोपांवरून महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा चढ-उतार सुरू झाले आहेत. शरद पवारांच्या 160 जागा जिंकून देण्याच्या प्रस्तावाविषयीच्या विधानाचे आदित्य ठाकरे यांनी समर्थन केले असून, शरद पवारांना राजकारणात खूप मोठा अनुभव आहे, त्यामुळे असे असू शकते, असे ते म्हणाले. तसेच वरळीत झालेल्या गोंधळावर त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना थेट सवाल केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी विधानसभा निवडणुकीबाबत मोठा गौप्यस्फोट केला आहे. निवडणुकीच्या आधी आमच्याकडे दोन माणसे भेटायला आली आणि 160 जिंकून देण्याचा प्रस्ताव दिला होता, असे ते म्हणाले. याबाबत आदित्य ठाकरे यांना विचारले असता, असे असू शकते, असे म्हणत शरद पवारांच्या गौप्यस्फोटाचे एकप्रकारे समर्थन केले.

आदित्य ठाकरे म्हणाले, शरद पवार साहेब अनेक वर्ष राजकारणात आहेत. त्यांचा अनुभव खूप मोठा आहे. त्यांनी आयुष्यात अनेक निवडणुका पाहिल्या आहेत. पहिल्यांदाज मतांची चोरी उघडपणे झालेली आहे. साधारणपणे निवडणूक आयोग भाजपच्या कार्यालयातून चालते, हे आता कळायला लागलेले आहे. आम्ही निवडणूक आयोगावर बोलतो आणि ते भाजपला झोंबते, अशी टीकाही त्यांनी केली. मतांची चोरी झाली की नाही, यासाठी खुलासा पाहण्याची गरज नाही. राहुल गांधी यांनी परवा काय खरे आणि काय खोटे हे पुराव्यानिशी दाखवले आहे, असेही आदित्य ठाकरे यांनी म्हटले.

दरम्यान, शुक्रवारी मुंबईतील वरळी परिसरात नारळी पौर्णिमा उत्सव साजरा करण्यात आला. ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरेआणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे त्याच व्यासपीठाजवळ पोहोचले आणि दोघांचेही समर्थक एकमेकांशी भिडले. काही काळ परिस्थिती तणावपूर्ण बनली, त्यामुळे वातावरण बिघडले. यावर आज आदित्य ठाकरे यांनी प्रतिक्रिया देताना एवढी भिती होती मग वरळीत आलात का? असा सवाल एकनाथ शिंदेंना केला.

# राहुल गांधींच्या खुलाशानंतर भाजपवर तोंड लपवण्याची वेळ : संजय राऊत

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ९ :



लोकशाहीमध्ये तोंड लपवण्याची वेळ भाजपवर आली आहे. 50 मतदारसंघात भाजपचे उमेदवार कसे विजयी झाले हे राहुल गांधींनी काल पुराव्यासह दाखवले आहे. राहुल गांधींनी टाकलेल्या बॉम्बमुळे यांच्या अब्रूच्या चिंधड्या उडाल्या आहेत, हे कसले खुलासे करत आहे, जे झाले हे स्पष्ट आहे, असे उबाठाचे नेते संजय राऊत यांनी म्हटले आहे.

खासदार संजय राऊत म्हणाले की, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांची जी युती आहे. हा इंडिया आघाडीचा विषय नाही. तो स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा विषय आहे. या निवडणुकीची राष्ट्रीय स्तरावर कधी चर्चा होत नाही, मग समोर महायुती असो की एनडीए. काही लोकांचे पक्षप्रमुख दिल्लीत असल्याने ते दिल्लीत जाऊन चर्चा करत असतील पण ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याचा विषयाचा आणि आघाडीचा काही संबंध आणि आक्षेप नाही.

खासदार संजय राऊत म्हणाले की, मराठीच्या प्रश्नावर महाराष्ट्र काँग्रेसची आणि आमची भूमिका एकच आहे. राजकीय दृष्टीने ठाकरे बंधू एकत्र आले याचा केंद्र बिंदू मराठी हाच आहे. शरद पवार असोत की हर्षवर्धन सपकाळ यांची भूमिका एकच आहे. आमच्यामध्ये मतभेद नाही. मुंबई वाचवण्यासाठी जर ठाकरे बंधूंनी घेतलेली भूमिका ही मराठी माणसांसाठी आनंदाची आहे. मनसेने परप्रांतीयांविरोधात भूमिका घेतलेली नाही.कधी काळी आमच्या विरोधातही हे आरोप होत होते. बंगालमध्ये तिथल्या भाषेसाठी आंदोलन सुरू आहे. तामिळनाडू मध्येही हे आंदोलन सुरू आहे तुम्ही महाराष्ट्रा वरच का आक्षेप घेत आहात? मराठी बोलणार नाही हे सांगितले की लोकांचा भडका उठतो. खासदार संजय राऊत म्हणाले की, मविआ ही विधानसभा तर इंडिया आघाडी लोकसभा निवडणुकीसाठी तयार करण्यात आली. स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी अशी आघाडी तयार झालेली नाही.प्रत्येक मनपा, जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी स्थानिक आघाड्या निर्माण केल्या जातात त्यात कधी-कधी राजकीय पक्षही नसतात. त्यामुळे ह्या निवडणुकीचे अधिकार स्थानिक पदाधिकाऱ्यांना असतात.

# हफ्ता न दिल्याने विक्रेत्याला पोलिसांनी केली बेदम मारहाण

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ९ :

दोन पोलिसांनी एका विक्रेत्याला मारहाण केल्याची चित्रफित सध्या समाजमाध्यमावर व्हायरल झाली आहे. समता नगर पोलीस ठाण्यातील एक पोलीस आणि महाराष्ट्र सुरक्षा बलाचा (एमएसएफ) कर्मचायार्ने ही मारहाण केल्याचे चित्रफितीत दिसत आहे. हफ्ता न दिल्याने ही मारहाण केल्याचा आरोप विक्रेत्याने केला आहे. याप्रकरणी संबंधित पोलिसांची विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.

मालाड पूर्व येथील कुरार परिसरातील गांधी नगरमध्ये ४० वर्षीय व्यक्ती पान, सुपारी विक्रीचे काम करते. त्याची पानाची टपरी आहे. काही दिवसांपूर्वी त्याच्याकडे समता नगर पोलीस ठाण्यातीन दोन पोलीस कर्मचारी आले. हा विक्रेता गुटख्याची विक्री करीत असल्याचा त्याच्यावर आरोप केला. त्याला पोलीस ठाण्यात घेऊन गेले. मात्र त्याच्यावर कारवाई न करता त्याच्याकडे पैशांची मागणी केली. यानंतर त्याच्यावर गुन्हा दाखल न करता सोडून देण्यात आले.

विक्रेत्याने सदर पोलिसांना ठरल्याप्रमाणे पैसे दिले नव्हते. त्यामुळे संतप्त झालेले दोन्ही पोलीस त्याच्या टपरीवर गेले. या दोघांनी भर रस्त्यात त्याला बेदम मारहाण केली. यावेळी बघ्यांची गर्दी जमली होती. त्यातील काहींनी या मारहाणीची चित्रफित तयार केली. परंतु पोलिसांना त्याची कल्पना नव्हती. हा प्रकार ५ ऑगस्ट रोजी घडला होता. ही चित्रफित समाजमाध्यमावर व्हायरल झाली आणि हा प्रकार समोर आला. सध्या या विक्रेत्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहे.

पोलिसांनी आणि महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या कर्मचाऱ्याने अशा प्रकारे मारहाण करणे चुकीचे असल्याचे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितले. संबंधित विक्रेत्याकडे बंदी असलेला गुटखा आढळला होता.

## भास्कर जाधव वादाच्या भोवऱ्यात

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :

गुहागरच्या राजकारणात आज पुन्हा एकदा वादाची ठिणगी पडली आहे. शिवसेना (ठाकरे गट) नेते भास्कर जाधव यांनी हेदवतडमधील सभेत "खोतकी" संदर्भात केलेल्या विधानाने ब्राह्मण समाजात संतापाची लाट उसळली.

गुहागर तालुका ब्राह्मण सहाय्यक संघाने जाधव यांच्यावर थेट आरोपांचा भडिमार करत, "स्वतःच्या राजकीय स्वार्थासाठी तुम्ही तालुक्यातील ऐक्याला तडे देत आहात" असा इशारा दिला आहे. संघाच्या मते, जाधव यांच्या वक्तव्यामुळे अनेक वर्षांचे सामाजिक ऐक्य धोक्यात आले आहे. येत्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या विधानामागे खोल राजकीय डाव असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. "आज तुम्ही बोलत आहात, पण भूतकाळात ब्राह्मण समाजातील असंख्य उंबरठे आणि ओट्या झिजवत तुम्हीच राजकीय उंची गाठली" अशी बोचरी आठवण जाधव यांना संघाने पत्राद्वारे करून दिली. गुहागरच्या गल्लीपासून तालुका पातळीपर्यंत या वादाने खळबळ उडवली आहे. भास्कर जाधव यांचे समर्थक हा विरोध राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा दावा करत असताना, ब्राह्मण समाज ठामपणे आपली भूमिका मांडत आहे. आता सगळ्यांच्या नजरा एका प्रश्नाकडे खिळल्या आहेत.भास्कर जाधव प्रत्युत्तर देणार का, की शांततेचा मार्ग स्वीकारणार?

## भाजपला हिंदूंशी काहीही देणेघेणे नाही

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ९ :



विजय वडेट्टीवार यांचा आरोप

भाजप हिंदुत्वाच्या नावाखाली स्वतःची राजकीय पोळी भाजत आहे. यांना हिंदूंशी काही देणं घेणं नाही. आताही म्हणतात हिंदू खतरे मैं है, आमची सत्ता होती तेव्हा हिंदू सुरक्षित होता. आता दिल्ली ते गल्ली हिंदुत्ववादी सरकार आहे तरी देखील हिंदू खतरे मै हे असे म्हणत व्होट जिहाद भाजपकडून सुरू आहे, असा आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, राज ठाकरे काय भूमिका घेतात? दोन भावांची युती होते, त्यांचे काय प्रस्ताव आहेत? त्यानंतर त्यांच्याकडून काही चर्चा होते का? खरं तर हा निर्णय राज्य पातळीवर होणार नाही.एकत्र बसायचा निर्णय हा स्थानिक पातळीवरचा निर्णय असतो.हा देशपातळीवरचा निर्णय नाही. त्यामुळे दोन बंधू एकत्र येऊ द्यात. अनेकांच्या पोटामध्ये खूप मोठ्या प्रमाणात वेदना होत आहेत. दोन भाव एकत्र आल्याने अनेकांची झोप उडाली आहे. ते आले तर आम्हाला आनंद आहे. काँग्रेस वेळेवर निर्णय घेईल पहिले ठाकरे बंधूंना एकत्र येऊ द्या. इंडिया आघाडी ही लोकसभेच्या निवडणुकीसाठी होती. विधानसभा निवडणुकीसाठी मविआ होती. आता स्थानिक आघाडी झाली तर तर झाली नाही झाली तर नाही झाली. स्थानिक पातळी संदर्भात राष्ट्रीय नेते लक्ष घालत नसतात. राहुल गांधी काय ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, मनपाला आघाडी करा असे सांगतात का? हा निर्णय स्थानिक लोकांना घ्यायचा आहे.

## दोन दुचाकींच्या धडकेत एकाचा मृत्यू, एक जखमी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :

भरधाव वेगात धावणाऱ्या दुचाकीने पुढील दुचाकीला धडक दिल्याची घटना शुक्रवारी चेंबूर परिसरात घडली. या अपघातात पुढील दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला असून पुढील दुचाकीला धडक देणाऱ्या दुचाकीवरील चालकही जखमी झाला आहे. याप्रकरणी टिळक नगर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

चेंबूरमधील छेडा नगर परिसरात शुक्रवारी सायंकाळी ५ च्या सुमारास हा अपघात झाला. या अपघातात हनिफ शेख (४०) याचा मृत्यू झाला. हनिफ शीव येथून ठाण्याच्या दिशेने जात होता. छेडा नगर उड्डाणपूल परिसरातून जात असताना पाठीमागून आलेल्या एका दुचाकीने फनिफच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात दोन्ही दुचाकीचालक गंभीर जखमी झाले. काही वाहन चालकांनी अपघाताची माहिती टिळकनगर पोलिसांना दिली. त्यानंतर तातडीने पोलिसांनी घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी दोघांनाही घाटकोपरमधील राजावाडी रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारापूर्वीच हनिफचा मृत्यू झाला होता. घटनास्थळी प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपी सोहेल खान याच्याविरोधात गुन्हा दाखल केला.

# हर्षवर्धन सपकाळ यांचा भाजपला 'चले जाव'चा इशारा

## 'करा किंवा मरा' अशी परिस्थिती निर्माण झाली असल्याचा दावा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :

देशात सध्या 'करा किंवा मरा' अशी परिस्थिती निर्माण झाली असल्याचा दावा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त भाजपला आमचा 'चले जाव'चा संदेश असल्याचेही त्यांनी सांगितले. महात्मा गांधी यांचे स्वप्न पुढे घेऊन जाण्याचा आमचा संकल्प असल्याचेही सपकाळ यांनी म्हटले आहे.



ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त भारत छोडो चळवळीच्या 83 व्या वर्धापन दिनानिमित्त महाराष्ट्र काँग्रेसने मुंबईतील ऑगस्ट क्रांती मैदानावर निदर्शने केली. ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त महाराष्ट्र काँग्रेसने भारत छोडो चळवळीच्या वर्धापन दिनानिमित्त मुंबईत मोर्चा देखील काढला. या वेळी महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, "हा मोर्चा महात्मा गांधींचा संकल्प पुढे नेण्याची प्रतिज्ञा आहे... या देशात हुकूमशाही आणण्याच्या प्रयत्न विरुद्ध लोकांनी आपला संघर्ष सुरू ठेवला पाहिजे, ज्यामुळे 'करा किंवा मरा' अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. आज आम्ही भाजपला निघून जाण्याचा संदेश देत असल्याचे सपकाळ यांनी म्हटले आहे.

ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त महात्मा गांधींचे पणतू तुषार गांधी देखील उपस्थित होते. व यांनी ईडीवरील केलेल्या आरोपांवर ते म्हणाले की, निवडणूक आयोगाने त्यांचे आरोप योग्यरित्या फेटाळले नाहीत. असे दिसते की ते सबबी सांगण्याचा प्रयत्न करीत आहेत..

म्हणून, जनतेने रस्त्यावर उतरून सरकारला आपली शक्ती दाखवणे अत्यंत महत्त्वाचे आहे." आज देशातील व्यवस्थेला तोडण्याचा प्रयत्न केला जात आहे.

# राज्यपालांचं पितृत्व आणि लेकींचं प्रेम...

## पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांच्या लेकींचे राजभवनात राखीबंधन

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ९ :

आईविना वाढलेल्या, पण ममताशून्य कधीच न झालेल्या पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांच्या ममता बाल सदन मधील निरागस मुलींनी रक्षाबंधनाच्या पावन पर्वावर एक अनोखी राखी आपल्या राज्यपिताच्या हातात बांधली... आणि राजभवनात क्षणभर जग थांबल्यासारखं वाटलं. राज्यपालांच पितृत्व आणि लेकींच प्रेम असा हृदयस्पर्शी अनुभव माईंच्या लेकींनी राज भवनात अनुभवला.



पद्मश्री डॉ.सौ. सिंधुताई सपकाळ यांच्या प्रेमळ सानिध्यात घडलेल्या या मुली, ज्यांनी जीवनात अडथळे पाहिले, पण हार मानली नाही, त्यांनी रक्षाबंधनाच्या पावन पर्वावर महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. सी. पी. राधाकृष्णन यांना राखी बांधली. ही केवळ एक औपचारिकता नव्हती, तर प्रत्येक राखीमागे होती एक भावना आम्हालाही कुणीतरी आहे. जे आमचं असतं. राज्यपालांनीही या मुलींना केवळ पाहुण्या म्हणून नाही, तर आपल्याच घरातल्या लेकीप्रमाणे प्रेमाने गळामिळवून घेतलं. त्यांनी प्रत्येकाच्या डोळ्यांत डोकावून तिच्या मनातली स्वप्नं जाणून घेतली, तिच्या हातात आश्वासक शब्दांची राखी बांधली. "तुम्ही एकट्या नाही आहात, मी तुमच्यासोबत आहे," हे शब्द तेव्हा त्यांच्या तोंडून नाही, तर डोळ्यांतून उमटत होते. सिंधुताईंच्या कार्याची आणि त्यागाची सावली ज्या लेकींच्या अंगावर असते, त्या लेकी इतक्या गोड, निरागस आणि आत्मविश्वासाने भरलेल्या असतात, हे पाहून अनेकांचे डोळे पाणावले. राजभवनाच्या भिंतींना आज लेकींच्या हसण्याचा गोड नाद ऐकू येत होता, आणि राज्यपालांच्या मृदू स्पर्शाने त्या लेकींच्या हृदयात वडिलांची उब खोलवर मुरत होती. हा सोहळा म्हणजे केवळ राखीचा नव्हता तो माणुसकीचा, आपुलकीचा, आणि प्रेमाच्या अमर बंधाचा होता.

राज्यपालांची भेट घेतलेल्या संस्थांमध्ये सिंधुताई सपकाळ यांनी सुरु केलेले ममता बाल सदन (बालगृह), कुंभारवळण, मुंबई महानगर पालिका शाळेतील विद्यार्थिनी, मुंबई मनपा अंतर्गत विविध महिला बचत गटांच्या सदस्य, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर,जिल्हा ठाणे येथील विद्यार्थिनी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण जिल्हा रायगड येथील विद्यार्थीनी, नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड (नॅब)च्या येथील दृष्टिहीन विद्यार्थिनी, प्रतीक्षा महिला बचत गटातील महिला यांचा समावेश होता. भारत विकास परिषद माटुंगा तसेच प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या भगिनी व बांधवांनी देखील राज्यपालांना राखी बांधली. या प्रसंगी राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, उपसचिव एस राममूर्ती, खासगी सचिव अर्चना गायकवाड, राज भवनचे जनसंपर्क अधिकारी उमेश काशीकर, पद्मश्री डॉ. सौ. सिंधुताई सपकाळ यांचे पहिले मानसपुत्र तथा ममता बाल सदन संस्थेचे अध्यक्ष दिपकदादा गायकवाड, अधीक्षिका स्मिता पानसरे, सुजाता गायकवाड, ममता बाल सदनचे जनसंपर्क अधिकारी मुकेश चौधरी, प्रसन्न गायकवाड, माईंच्या लेकी कु. साक्षी, कु. अनिता, कु. जान्हवी, कु. पावनी आदि उपस्थित होते. यावेळी राज्यपालांनी सर्वांच्या राखीचा स्वीकार करीत सर्वांची विचारपूस केली .

# आयडीबीआय बँकेतील प्रस्तावित हिस्सा विक्री विरोधात कर्मचारी संघटनांचे धरणे आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ९ :

सरकार आणि एलआयसीकडून आयडीबीआय बँकेतील प्रस्तावित हिस्सा विक्रीला विरोध करण्यासाठी युनायटेड फोरम ऑफ आयडीबीआय ऑफिसर्स अँड एम्प्लॉईजने (०९ ऑगस्ट २०२५) रोजी मुंबईतील आझाद मैदान येथे धरणे आयोजित केले. या धरणे आंदोलनात २५० हून अधिक सदस्य सहभागी झाले होते आणि सरकारच्या या कुटिल हेतूबद्दल त्यांनी नाराजी दर्शविली आहे.धरणे आंदोलनाचे अध्यक्षपद ऑल इंडिया आयडीबीआय ऑफिसर्स असोसिएशनचे अध्यक्ष कॉम. सौरव कुमार यांच्यासह युनायटेड फोरमचे संयोजक शिर देवीदास तुळजापूरकर, युनायटेड फोरमचे संयुक्त संयोजक श्री विठ्ठल कोटेश्वर राव आणि युनायटेड फोरमचे संयुक्त संयोजक श्री रत्नाकर वानखेडे यांनी भूषवले.




धरणे आंदोलना दरम्यान, सदस्यांनी नफा मिळवणाऱ्या आणि पुनरुज्जीवित झालेल्या संस्थेला खाजगी कंपन्यांना विकल्याबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली. आयडीबीआय बँकेने गेल्या आर्थिक वर्षात ७५१५ कोटी रुपयांचा निव्वळ नफा नोंदवून उल्लेखनीय वसुली केली आहे आणि एकूण एनपीए ५५५८८ कोटी रुपयांवरून (२७.९५%) फक्त रु. ६६९२ कोटी (२.९८%), या क्षेत्रातील सर्वोत्तम बँकांपैकी एक. बँकेची नफाक्षमता आणि आर्थिक उलाढाल चांगली असूनही, बँकेचे खाजगीकरण करण्यामागील तर्कावर असोसिएशनने प्रश्नचिन्ह उपस्थित केले.असोसिएशनने या निर्णयाला वित्तीय न्याय, आर्थिक स्वायत्तता आणि आत्मनिर्भर भारताच्या आदर्शांसाठी धोका असल्याचे म्हटले आणि सरकारला निर्गुंतवणुकीचा पुनर्विचार करण्याचे आवाहन केले.

पुढे, आंदोलन तीव्र करण्यासाठी, युनायटेड फोरमने ११ ऑगस्ट २०२५ रोजी प्रस्तावित भागभांडवल विक्रीला तीव्र विरोध करण्यासाठी देशव्यापी संपाची घोषणा केली आहे. विशेषतः दुबईतील एमिरेट्स एनबीडी आणि कॅनडातील परदेशी मूळ असलेल्या फेअरफॅक्स फायनान्शियल होल्डिंग्ज लिमिटेड यासारख्या परदेशी मूळ असलेल्या संस्थांना, जे आयडीबीआय बँक खरेदी करण्याचे मुख्य दावेदार आहेत, त्यांना विकले जावे असे कोणतेही कारण नाही. हे विशेषतः हास्यास्पद आहे जेव्हा भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकार सत्तेत असते जे नेहमीच स्वदेशी आणि स्वावलंबनाचे समर्थन करते.संघटनांच्या मते, बोलीदारांना आता आर्थिक सेवा वाढविण्यात रस नाही तर त्यांना तेलंगणातील हैदराबाद येथील ५० एकर मालमत्तेसह आयडीबीआय बँकेच्या मालकीच्या विविध रिअल इस्टेट मालमत्तेत रस आहे. केंद्र सरकार ही प्रक्रिया लवकर पूर्ण करण्यास उत्सुक असल्याने, असे दिसते की बोलीदार भारत सरकार आणि नियामकांकडून विविध सवलती आणि सवलती मिळविण्यासाठी जोरदार सौदेबाजी करत आहेत. आजच्या तारखेला, आयडीबीआय बँकेत केंद्र सरकारचा ४५.४८% हिस्सा आहे, तर केंद्र सरकारच्या मालकीच्या एलआयसीचा ४९.२४% हिस्सा आहे आणि अर्थ मंत्रालयाच्या गुंतवणूक आणि सार्वजनिक मालमत्ता व्यवस्थापन विभाग केंद्र सरकारचा ३०.४८% हिस्सा आणि एलआयसीचा ३०.२४% हिस्सा विकण्याच्या प्रक्रियेत आहे.

## मतदार चोरीवरून विखे थोरात आमने-सामने

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ९ :

दिल्लीपासून संगमनेरपर्यंत राजकारणात वादळ उठवणारा मतदार चोरीचा मुद्दा आता थेट शिर्डीच्या राजकीय रिंगणात पेटला आहे. काँग्रेस नेते व लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी नुकतेच तीन राज्यांमधील मतदान चोरीचा आरोप करत निवडणूक आयोगावर थेट हल्ला चढवला. त्यातच शिर्डी मतदारसंघातील मतदार नोंदणी घोटाळ्याचा उल्लेख करताच महाराष्ट्रातील राजकीय पारा चढला.

राहुल गांधींच्या विधानानंतर संगमनेरचे काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी भाजप मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या शिर्डी विधानसभा मतदारसंघावर निशाणा साधला. थोरातांच्या आरोपांवर मंत्री विखे पाटील तितक्याच जोशात उतरले. कर्नाटक आणि तेलंगणात काँग्रेसचे सरकार बोगस मतदानाने आले का? लोकांनी महाविकास आघाडीला धुडकावले, हे मतदारांचा अपमान आहे असा पलटवार करत राहुल गांधींवरही निशाणा साधला. राहुल गांधींनी बोगस मतदानाबाबत शपथपत्र केलं, तर आरोप सिद्ध करावे लागतील.

महासागर
रविवार, दि. 10 ऑगस्ट 2025
अमरावती
पान 3

# पार्डी बोरांग परिसरात इसमाची गळफास घेऊन आत्महत्या

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.९ )** – वरुड शहरातील पार्डी बोरांग परिसरात राहणाऱ्या एका 29 वर्षीय इसमाने स्वतःच्या भाड्याच्या राहत्या खोलीत गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना आज दुपारी पाचच्या सुमारास उघडकीस आली. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मृताचे नाव आशिष ओंकार दंदी (रा. पार्डी बोरांग, मूळ रा. उदापूर) असे असून, ते मागील तीन वर्षांपासून या भागात वास्तव्यास होते. मागील वर्षीच त्यांचा विवाह झाला होता. घटनेच्या वेळी पत्नी घराबाहेर असल्याने त्यांनी एकटेपणाचा फायदा घेत आत्महत्येचे टोकाचे



पाऊल उचलल्याची प्राथमिक माहिती आहे. दंदी हे पंचायत समितीसमोर आधार केंद्र चालवत होते. दुपारी पाचच्या सुमारास ही घटना घडली. माहिती मिळताच वरुड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला व मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठविला. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पुढील तपास वरुड पोलिस करत आहेत.


# घरफोडी व रिव्हाल्वर चोरी प्रकरणातील आरोपी अटक

## मोर्शी पोलिसांची 12 तासांत धडाकेबाज कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, ( दि. 9 )** – मोर्शी पोलीस ठाणे हद्दीत घडलेल्या घरफोडी व सर्व्हिस रिव्हाल्वर चोरीच्या प्रकरणात पोलिसांनी अवघ्या 12 तासांत आरोपीला जेरबंद करून चोरीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. ही कारवाई मोर्शी पोलीस ठाण्याच्या पथकाने केली.

फिर्यादी प्रदीपकुमार पवार, उप-विभागीय अधिकारी (महसूल), मोर्शी यांनी तक्रार दिली होती की, दि. 08 ऑगस्ट 2025 रोजी दुपारी 2 वाजता त्यांच्या शासकीय निवासस्थानात उभी असलेली क्रेटा कार अज्ञात






चोरट्याने काच फोडून उघडली. डॅशबोर्डमधील डिक्कीत ठेवलेली किंमत 90 हजार रुपयांची सर्व्हिस रिव्हाल्वर चोरली. तसेच घराचे कुलूप तोडून आत प्रवेश करून कपाटातील कागदी रिमही लंपास केली.

या प्रकरणी मोर्शी पोलीस ठाण्यात कलम 305 (बी), 331(1), 324(2) भा. दं. सं. अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी तात्काळ आरोपीचा शोध घेऊन चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्याचे आदेश दिले. मोर्शी पोलीस ठाण्याच्या पथकाने परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक माहिती आणि गुप्त तपासाच्या आधारे अवघ्या 12 तासांत आरोपी अजय ऊर्फ राजेश गोवर्धन दांडगे (वय 36, रा.



तळणी, पुर्णा, ता. चांदुरबाजार) याला ताब्यात घेतले. सुरुवातीला आरोपीने उडवाउडवीची उत्तरे दिली; मात्र विश्वासात घेऊन केलेल्या चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्याकडून फिर्यादींची सर्व्हिस रिव्हाल्वर जप्त करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावर यांच्या मार्गदर्शनाखाली, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांच्या नेतृत्वात ठाणेदार पो.नि. राहुल आठवले, स.पो.नि. आर.टी. नांदगांवकर, लक्ष्मण चिंचोले, पो.उप.नि. आकाश शिवणकर, पोलीस अमलदार गजानन सुंदरकर, योगेश सांभारे, मनोज गायकी, संदीप वंजारी, स्वप्नील बायस्कर, अर्थव कोहळे व अ. हबीब यांनी केली. पोलीसांच्या वेगवान कारवाईमुळे अधिकारीवर्ग व स्थानिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. ही मोहीम गुन्हेगारीवर पोलिसांची पकड अधोरेखित करणारी ठरली आहे.

# दर्यापूरातील विक्रम ज्वेलर्स चोरी प्रकरणातील आरोपी जेरबंद

## 5 लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल हस्तगत

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर ( दि. 9 )** – दर्यापूर येथील विक्रम ज्वेलर्समध्ये झालेल्या 77 लाख 69 हजार 500 रुपयांच्या चोरीप्रकरणी पोलिसांनी जलद गतीने तपास करून आरोपींना गजाआड करत 5 लाख 2 हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

8 ते 9 मेच्या दरम्यान बनोसा येथील मेन मार्केटमधील विक्रम ज्वेलर्सचे शटर तोडून अज्ञात चोरट्यांनी 760 ग्रॅम सोने, 12.8 किलो चांदी, 5.5 लाख रुपये रोख रक्कम व सीसीटीव्ही डिव्हीआर असा एकूण 77.69 लाखांचा मुद्देमाल चोरून नेला होता. फिर्यादी रमेश लोणकर यांच्या तक्रारीवरून दर्यापूर पोलिसांनी गुन्हा नोंदविला. तपासादरम्यान अमरावती ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने 17 मे रोजी जालना आणि बुलढाणा जिल्ह्यातील पाच आरोपींना अटक करून 12.96 लाखांचा मुद्देमाल व चारचाकी वाहन जप्त केले. पुढील तपासात फरार तिघा आरोपींना श्रीरामपूर (अ.नगर) येथून अटक करून चौकशीत त्यांनी चोरीचे सोने भंडारा येथील सोनाराला विकल्याची कबुली दिली. त्यानुसार पोलिसांनी 41.61 ग्रॅम सोने (किंमत ?3.32 लाख) व आरोपींच्या घरातून 1.6 किलो चांदी ( ?1.70 लाख) जप्त केली. एकूण 5.02 लाखांचा मुद्देमाल पीसीआर दरम्यान हस्तगत करण्यात आला. ही कारवाई पोलिस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलिस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलिस अधिकारी अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुनिल वानखडे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. घटना घडल्यानंतर दर्यापूर येथील सर्व सुवर्णकारांनी एसपी कार्यालयावर धडक दिली होती. पोलिसांनी केवळ तीन ते चार महिन्यांत गुन्हा उघडकीस आणला आहे.

# मध्यप्रदेशातून आणली देशी बनावटी पिस्तूल

## गुन्हे शाखेची कारवाई | फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 9 ) :** अमरावती शहर पोलीस आयुक्तांनी घातक शस्त्रे व अग्निशस्त्रे बाळगणारे किंवा विक्री करणाऱ्यांविरोधात विशेष मोहिम राबविण्याचे आदेश दिल्यानुसार, गुन्हे शाखा युनिट-1 च्या पथकाने देशी बनावटी पिस्तूल बाळगणाऱ्या एका आरोपीला रंगेहात पकडले. सुदाम धनुसिंग चव्हाण (वय 35, रा. तांडा, पोहरा बंदी, ता. व जि. अमरावती) असे आरोपीचे नाव असून, त्याने मध्यप्रदेशातून ही देशी बनावटी पिस्तुल आणल्याचे पोलिसांना सांगितले आहे.

शुक्रवारी (8 ऑगस्ट) सायंकाळी अंदाजे 4.30 वाजता गुप्त माहितीच्या आधारे पोहरा बंदी गावाजवळील नवसारी हनुमान मंदिर परिसरात सापळा रचण्यात आला. दरम्यान पोलिसांनी संशयित इसम सुदाम धनुसिंग चव्हाण याची अंगझडती घेतली असता त्याच्या कमरेला एक देशी बनावटी पिस्तूल व मॅगझिन मिळाले. पोलिसांनी ते जप्त केले. जप्त शस्त्राची किंमत अंदाजे 10,000 आहे. आरोपीविरुद्ध फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायद्यानुसार गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरीया, उपायुक्त रमेश धुमाळ, उपायुक्त गणेश शिंदे, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे, सहायक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली, वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. या मोहिमेत स.पो.नि. मनीष वाकोडे, इम्रान नायकवडे, सपोउपनि. युसुफ सौदागर, अशोक वाटाने, तसेच गुन्हे शाखा युनिट-1 चे इतर अधिकारी व कर्मचारी, तसेच सायबर पथकाचे तांत्रिक सहकार्य लाभले.

### 15 हजारात विकली घेतली पिस्तुल

आरोपी सुदाम हा चारचाकीचा वाहन चालक असून, तो मध्यप्रदेश व उत्तरप्रदेशात प्रवाशांना घेऊन जात होते. दरम्यान त्याने एका व्यक्तीजवळून 15 हजार रुपये किंमतीची बनावटी देशी पिस्तुल घेतली. तो आपल्या वाहनात पिस्तुल बाळगून राहत होता. काही स्वरंक्षणाचे काम पडल्यास उपयोग करू, असा त्याचा उद्देश होता. आरोपीला फ्रेजरपुरा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले असून, त्याला 9 ऑगस्ट रोजी न्यायालयात हजर करण्यात आले.



# एमआयडीसीतील एअर कार्गो ट्रान्सपोर्टला भीषण आग

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 9 )** – अमरावती एमआयडीसी परिसरातील एअर कार्गो ट्रान्सपोर्ट कंपनीला शनिवारी पहाटे भीषण आग लागली. ही घटना पहाटे 4.20 वाजता उघडकीस आली. माहिती मिळताच अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि दोन तासांच्या प्रयत्नांनंतर आग नियंत्रणात आणली. पहाटे 3.30 वाजता ट्रान्सपोर्ट कंपनीत आग लागल्याची माहिती अग्निशमन दलाला मिळाली होती. या माहितीवरून अग्निशमन दलाची 5 वाहने घटनास्थळी पोहोचली. त्यानंतर आगीवर पाण्याचा मारा करून नियंत्रण मिळवण्यात आले. या आगीत कुरिअर साहित्य, एक दुचाकी, ऑटो पार्टस् तसेच इलेक्ट्रीक वस्तू जळून खाक झाल्या. आगीमुळे झालेल्या नुकसानीचे अंदाजपत्रक तयार करण्याचे काम सुरू आहे. आग लागण्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून अग्निशमन विभाग व पोलिस तपास सुरू आहे.

# मोटरसायकल चोरी प्रकरणातील अट्टल गुन्हेगार गजाआड

## स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीणची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 9 )** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मोटारसायकल चोरी करणाऱ्या अट्टल गुन्हेगाराला चांदुर रेल्वे परिसरातून पकडून 50,000 किमतीची बजाज पल्सर जप्त केली. अटक आरोपीचे नाव आकाश पुरुषोत्तम चव्हाण (30, रा. बोरखेडी, ता. शेलु, जि. वर्धा) असे आहे.

7 डिसेंबर 2023 रोजी धामणगाव रेल्वे येथील रामदेव बाबा नगरमध्ये राहणारे नवीन रामदास धोटे (30) यांनी बजाज पल्सर (एमएच 27 सीक्यू 8214) घरासमोर उभी केली असता अज्ञात चोरट्याने ती चोरून नेली होती. या प्रकरणी दत्तापूर पोलीस ठाण्यात कलम 379 भा.दं.वि. अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला होता. या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू असताना पथकाला गोपनीय माहिती मिळाली की आरोपी आकाश चव्हाण चोरीची मोटारसायकल विक्रीसाठी चांदुर रेल्वे परिसरात फिरत आहे. त्यानुसार पथकाने सापळा रचून त्याला पल्सरसह ताब्यात घेतले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी मोटारसायकल जप्त करून आरोपीसह पुढील कार्यवाहीसाठी दत्तापूर पोलिसांच्या ताब्यात दिले. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, पोलीस निरीक्षक (स्थानिक गुन्हे शाखा) किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मो. तसलीम, मुलचंद भांबुरकर, अमोल देशमुख, मंगेश लकडे, सचिन मसांगे, दिनेश कनोजीया, सागर धापड, विकास अंजीकर तसेच सायबर शाखेचे चालक पोलीस हवालदार हर्षद घुसे यांनी केली.

# पोस्को प्रकरणात 22 तासांतच चार्जशीट दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 9 )** – 6 ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेपाच वाजता नागपुरी गेट पोलिस ठाण्याच्या हद्दीतील 11 वर्षीय मुलीचा विनयभंग झाल्याची घटना घडली. त्यानंतर मुलीच्या कुटुंबीयांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी आकाश श्रीकृष्ण आगम (30) याला पोलिसांनी भादंवि कलम 376 आणि पोस्को कायद्यांतर्गत अटक केली आणि पोलिसांनी 22 तासातच तपास पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. तक्रार मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब नोंदवले, तसेच सर्व पुरावे एकाच दिवसात गोळा केले. यानंतर आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून केवळ 22 तासांत चार्जशीट तयार करण्यात आली आणि ती न्यायालयात दाखल करण्यात आली. या गुन्ह्याचा तपास पोलिस अधिकारी प्रताप कुलथे यांनी केला. या जलदगती कारवाईचे पोलिस आयुक्त अरविंद चावरिया, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त अरुण पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनुमंत उरलागोंडावर यांनी कौतुक केले.

### शहराच्या इतिहासातील पहिल्यांदाच इतक्या वेगाने चौकशी

नागपुरी गेट पोलिसांच्या या 'फुल स्पीड' तपासामुळे शहरात चर्चेचा विषय झाला आहे.

श्रावण सोमवार विशेष

# अरुणेश्वर धामातील स्वयंभू शिवलिंगाचे अनोखे महत्व

- स्वयंभू प्रगट शिवलिंगाची पाच दशकांपूर्वी स्थापना
- 300 मीटर आत तर 130 फूट खोल आहे हे पवित्र स्थळ

**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर बाजार,( दि.९ )** – अमरावती जिल्ह्यातील चांदुरबाजार तालुक्यातील निंभोरा गावातील पूर्णा नदीच्या काठावर वसलेले अरुनेश्वर धाम हे भाविकांचे श्रद्धास्थान ठरत आहे. श्रावण महिन्यात येथे पंचक्रोशीसह दूरदूरवरून भाविक दर्शनासाठी मोठ्या संख्येने दाखल होत असून, परिसरात दिवसरात्र भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळते.



विदर्भातील प्रसिद्ध मंदिरांपैकी अरुनेश्वर धामाचे महत्व अलीकडच्या काळात अधिक वाढले आहे. चांदुरबाजारपासून सुमारे 10 किलोमीटर अंतरावर असलेल्या या पवित्र स्थळावर जमिनीच्या सुमारे 100 फूट खोलीत 12 छोटे व मधोमध एक मोठे स्वयंभू शिवलिंग आहे. आख्यायिकेनुसार, या शिवलिंगांची प्रकट स्थापना पाच दशकांपूर्वी झाली. 1989 साली संत बालयोगी हरिहरजी दादाजी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने गुहेचे बांधकाम सुरू झाले. आजही भक्त आणि ग्रामस्थांच्या मदतीने या ठिकाणी विकासकामे सुरू आहेत. गुहेत प्रवेश करण्यासाठी तीन दरवाजे आहेत. सध्या मधल्या दरवाजातून आत प्रवेश दिला जातो. आत गेल्यानंतर सुमारे 55 पायऱ्या उतरून, कंबरभर पाण्यातून 10 पायऱ्या पार केल्यानंतर शिवलिंगापर्यंत पोहोचता येते. दर्शनासाठी गुहेत जाण्यापूर्वी स्नान करणे आवश्यक असून, भाविकांच्या सोयीसाठी त्याची सोय परिसरात करण्यात आली आहे. मंदिर परिसरात अनेक वर्षांपासून अखंड धुनी प्रज्वलित आहे. तसेच, परिसरातील एका विशाल झाडाखाली विविध राज्यांची नावे लिहिलेल्या रिकाम्या तेलाच्या डब्यांमध्ये पक्ष्यांनी आपली घरटी केलेली दिसतात. वृक्षारोपण आणि परिसराची स्वच्छता याकडे संत हरिहरजी दादाजी कटाक्षाने लक्ष देतात. श्रावण महिन्यातील सोमवारचे औचित्य साधून, हजारो भाविक या अद्भुत, शांत आणि अध्यात्मिक उर्जेने भरलेल्या स्थळी दर्शनासाठी गर्दी करत आहेत.

### तीर्थस्थळाला 'ब' दर्जा मिळावा



मंदिराचे बांधकाम भाविकांच्या देणगीवर सुरू आहे. या स्थळाला 'क' दर्जा असलेले तीर्थक्षेत्र मान्यता आहे. मात्र भाविकांच्या वाढत्या संख्येचा विचार करून 'ब' दर्जा मिळावा, जेणेकरून अधिक सुविधा उपलब्ध होतील, अशी मागणी होत आहे.

# हुमणी अळी शेतकऱ्यांच्या जीवावर

## येलकी परिसरात पिकांचे मोठे नुकसान | युवा सेनेचा तालुका कृषी अधिकाऱ्यांना घेराव




**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर, ( दि.9 )**– अचलपूर तालुक्यातील मौजा येलकी शेतशिवारात हुमणी अळीचा प्रादुर्भाव वाढल्याने शेतकऱ्यांवर संकट कोसळले आहे. अळी मोठ्या प्रमाणात नव्याने उगवणाऱ्या पिकांच्या मुळे व बियांचे अंकुर खाते आहे, ज्यामुळे पिके डोळ्यादेखत नष्ट होत आहेत. या नुकसानीमुळे अनेक शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ आली आहे.

स्थितीची गंभीरता लक्षात घेऊन अचलपूर युवा सेनेच्या कार्यकर्त्यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालयावर धडक देत घेराव घातला. त्यांनी तातडीने उपाययोजना कराव्यात, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला. युवा सेना उपतालुका प्रमुख सुरज उर्फ हर्षद करडे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने कृषी अधिकाऱ्यांना निवेदन दिले. यामध्ये हुमणी अळी नियंत्रणासाठी त्वरित फवारणी मोहीम हाती घेणे, शेतकऱ्यांना आवश्यक औषधांचा मोफत पुरवठा करणे आणि नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत देण्याची मागणी करण्यात आली.

या वेळी वैभव करडे, जितेश बोबडे, निलेश करडे, संदीप करडे, प्रफुल बोबडे, अमोल करडे, यश करडे, सुशील दह्याडकर, तेजस बोबडे, प्रशांत करडे, अतुल पावडे, अमित करडे यांच्यासह येलकी परिसरातील अनेक तरुण शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, पिकांचे वाढते नुकसान थांबवण्यासाठी प्रशासनाने वेगाने कारवाई केली नाही तर संपूर्ण पेरणी धोक्यात येईल आणि आर्थिक फटका सहन करावा लागेल.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# ट्रम्प टॅरिफमुळे सोने आणखी महागणार?

**ऑगस्ट महिन्यात सोन्याच्या किमती दररोज सरासरी ५०० रुपयांनी वाढत आहेत. ८ ऑगस्ट रोजी २४ कॅरेट सोन्याचा भाव पहिल्यांदाच १,०१,४०६ रुपये प्रति १० ग्रॅमवर पोहोचला. फक्त ७ दिवसांपूर्वी म्हणजे १ ऑगस्ट रोजी तो ९७,९७१ रुपये होता. २०२५ मध्ये सोने आतापर्यंत किती महागले आहे, ट्रम्प यांचे टॅरिफ किमती आणखी वाढवतील का आणि आता काय? सोने खरेदी करणे फायदेशीर आहे का?**

--------------

इंडियन बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशन नुसार, १ जानेवारी २०२५ रोजी १० ग्रॅम २४ कॅरेट सोन्याची किंमत ७६,१६२ रुपये होती. भारतातील या किमती आतापर्यंतच्या उच्चांकी होत्या. पण एका महिन्यानंतर सोन्याची किंमत ६,००० रुपयांपेक्षा जास्त वाढली आणि १ फेब्रुवारी रोजी ती ८२,००० रुपये ओलांडली. त्यानंतर दरमहा सोन्याच्या किमती वाढतच गेल्या.

आयबीजेएच्या मते, जूनमध्ये सोन्याचा भाव ९५,००० रुपयांच्या पुढे गेला. जुलैमध्ये काही किमती स्थिर राहिल्या. परंतु ऑगस्टमध्ये पुन्हा एकदा वेगाने वाढ दिसून आली. ८ ऑगस्ट रोजी सोन्याच्या किमतीत ७०३ रुपयांची वाढ झाली आणि ती १,०१,४०६ रुपये प्रति १० ग्रॅम झाली. आतापर्यंतच्या सोन्याच्या किमतींमधील हा सर्वोच्च उच्चांक आहे. तथापि, ८ ऑगस्टच्या संध्याकाळपर्यंत सोन्याचा भाव ४६४ रुपयांनी घसरून १,००,९४२ रुपये प्रति १० ग्रॅम झाला.

केडिया अॅडव्हायझरीचे संचालक आणि व्यवसाय तज्ज्ञ अजय केडिया यांच्या मते, या वर्षी भारतात सोने महाग होण्याची ४ मुख्य कारणे आहेत.

जागतिक अस्थिरतेमुळे सोन्याची मागणी वाढली भारतातील सोन्याच्या किमती जागतिक बाजारपेठेवर अवलंबून असतात, कारण भारत त्याच्या गरजेच्या जवळपास निम्मे उत्पादन करतो. ९०% सोने आयात केले जाते. भारतात सोन्याचे उत्खनन खूपच मर्यादित आहे. यामुळे, जागतिक बाजारात सोन्याच्या किमती वाढल्याने, भारततही सोने महाग होते.

वर्ल्ड गोल्ड कौन्सिलनुसार, भारतात सोन्याची मागणी दरवर्षी सुमारे ८०० टन आहे. भारताने २०२४ मध्ये ७१२.१ टन सोने आयात केले होते, जे २०२३ मध्ये ७४४ टनांपेक्षा ४% कमी होते. भारत अमेरिकेतून सर्वाधिक सोने खरेदी करतो. भारताच्या वाणिज्य मंत्रालयाच्या मते, २०२४-२५ या आर्थिक वर्षात भारत अमेरिकेतून ३.२७ लाख कोटी रुपयांचे सोने आयात करेल. २०२३ च्या तुलनेत ४९% जास्त सोने खरेदी केले.

या वर्षी जानेवारीपासून जागतिक अर्थव्यवस्थेचा अंदाज लावणे कठीण झाले आहे. अमेरिका आणि चीनमधील व्यापार युद्ध, मध्य पूर्वेतील इस्त्रायल आणि हमास यांच्यातील संघर्ष, रशिया-युक्रेन युद्ध आणि ट्रम्पच्या शुल्कामुळे गुंतवणूकदारांनी सोन्यात गुंतवणूक केली. सोन्याला सुरक्षित गुंतवणूक मानले जाते, म्हणूनच जागतिक संकटाच्या काळात त्याची मागणी वाढली.

भारतात सोने बहुतेक परदेशातून खरेदी केले जाते आणि त्याचे पेमेंट अमेरिकन डॉलरमध्ये केले जाते. परंतु जर भारतीय रुपया डॉलरच्या तुलनेत कमकुवत झाला तर सोने खरेदी करण्यासाठी अधिक रुपये द्यावे लागतात. यामुळे भारतात सोने खरेदी करणे महाग झाले.

जानेवारी ते ऑगस्ट या कालावधीत डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपया कमकुवत झाला, कारण परदेशी गुंतवणूकदार भारतातून त्यांचे पैसे काढून घेत आहेत. त्यामुळे रुपयाचे मूल्य २-३% ने कमी झाले. ऑगस्ट २०२५ मध्ये १ डॉलरची किंमत ८३.५ रुपयांवरून ८७.६० रुपयांवर पोहोचली. त्यामुळे सोने आयात करण्याचा खर्च वाढला.

महागाई वाढल्याने सोन्यातील गुंतवणूक वाढते जेव्हा महागाई वाढते तेव्हा लोक सोन्यात गुंतवणूक करतात कारण ते महागाईपासून सुरक्षित असते. गुंतवणूक महत्त्वाची असते. त्यामुळे मागणी वाढते आणि किमती वाढतात.

मार्च २०२५ मध्ये जेव्हा भारतातील किरकोळ महागाई ६% च्या जवळ पोहोचली तेव्हा गुंतवणूकदारांनी सोन्यात गुंतवणूक करण्यास सुरुवात केली. आयबीजेएच्या मते, २८ मार्च रोजी सोन्याचा भाव ९९,१०० रुपये प्रति १० ग्रॅम या सर्वोच्च पातळीवर होता. फुगावाने सोन्याच्या किमती ४,००० ते ५,००० रुपयांनी वाढवल्या. लोकांनी तेल आणि अन्नपदार्थांऐवजी सोन्यात गुंतवणूक केली.

केंद्रीय बँकांच्या धोरणांमुळे आणि व्याजदरांमुळे सोने महागले जेव्हा व्याजदर कमी असतात तेव्हा सोन्यातील गुंतवणूक वाढते कारण बँक ठेवी कमी परतावा देतात. यामुळे सोन्याची मागणी आणि किमती वाढणे निश्चित आहे. जून २०२५ मध्ये अमेरिका आणि यूकेसारख्या देशांनी व्याजदर कमी केले, ज्यामुळे सोन्यातील गुंतवणूक वाढली.

अमेरिकेने व्याजदर ०.२५% ने कमी केले, ज्यामुळे गोल्ड ईटीएफमधील गुंतवणूक वाढली. भारततही रिझर्व्ह बँकेन व्याजदर स्थिर ठेवले. आयबीजेएच्या मते, जूनमध्ये सोन्याचा भाव ९७,६०९ रुपयांवरून जुलैमध्ये १,००,६८९ रुपये प्रति १० ग्रॅम झाला, जो त्यावेळी आतापर्यंतचा सर्वोच्च होता.

शिवाय, भारतात सण आणि लग्नाच्या काळात सोन्याची मागणी वाढते, कारण सोन्याला सांस्कृतिक महत्त्व आहे. यावर्षी सणांमुळे सोन्याच्या किमती प्रति १० ग्रॅम ३,००० ते ४,००० रुपयांनी वाढल्या. ट्रम्पच्या टॅरिफमुळे सोन्याच्या किमती अजूनही वाढतील असे तज्ज्ञांचे मत आहे

स्वित्झर्लंड हे जगातील सर्वात मोठे सोने शुद्धीकरण केंद्र आहे, जे जगातील ७०% सोने शुद्ध करते. म्हणजेच, स्वित्झर्लंड कच्चे सोने घेते आणि ते चमकदार बार किंवा नाण्यांमध्ये परिष्कृत करते.






अमेरिका हा या सोन्याचा सर्वात मोठा खरेदीदार आहे. डिसेंबर २०२४ मध्ये अमेरिकेने स्वित्झर्लंडमधून ६४.२ टन सोने आयात केले.

ट्रम्प हे फेब्रुवारी २०२५ मध्ये पहिल्यांदा स्वित्झर्लंडवर कर लादण्याबद्दल बोलले, ज्यामुळे लोकांनी सोन्याचा साठा करायला सुरुवात केली. जगात सोन्याची मागणी वाढली आणि सोने महाग झाले. कर लावण्याच्या बातम्यांमुळे अमेरिकेत सोन्याचे भाव लंडनपेक्षा जास्त झाले. लंडनच्या तुलनेत न्यू यॉर्कमध्ये सोने प्रति औंस ४० डॉलरने महाग झाले.

स्वित्झर्लंडमधील व्यापाऱ्यांनी या फरकाचा फायदा घेण्यासाठी मनमानी सुरू केली, म्हणजेच इतर देशांपेक्षा अमेरिकेत जास्त सोने पाठवण्यास सुरुवात केली. यामुळे, जगभरातील सोन्याचा पुरवठा थोडा कमी झाला आणि भारतात सोने आयात करणे महाग झाले.

अजय केडिया यांच्या मते, ट्रम्प यांनी स्वित्झर्लंडवर ३९% कर निश्चित केला आहे. त्यामुळे स्विस व्यापाऱ्यांना सोने विकण्यात अडचणी येतील. जर मागणी वाढली आणि पुरवठा पूर्ण होऊ शकला नाही, तर सोने अधिक महाग होईल. तथापि, किती महाग आहे हे सध्या सांगणे कठीण आहे.

जरी जागतिक बाजारपेठेतील परिस्थिती सतत बदलत असली तरी, हे देखील लक्षात ठेवले पाहिजे की सोन्यातील कोणतीही मोठी गुंतवणूक ही आर्थिक बाजारपेठेतील मोठ्या खेळाडूंच्या दयेवर असते. मोठे खेळाडू काहीही करतात, त्याचा परिणाम सोन्याच्या किमतींवर दिसून येतो. म्हणून विचारपूर्वक सोन्यात गुंतवणूक करावी.

अजय केडिया म्हणाले, सोन्याने आधीच ३०% परतावा दिला आहे. जेव्हा असे होते, तेव्हा बाजारात सोन्याची रिप्लेसमेंट येते आणि मागणी कमी होते. अशा परिस्थितीत, जर तुम्हाला बचतीसाठी सोने खरेदी करायचे असेल, तर ठीक आहे, पण गुंतवणुकीसाठी चांदी चांगली आहे. या वर्षी चांदीमध्ये जास्त परतावा अपेक्षित आहे.

तथापि, अनुज गुप्ता म्हणतात, सध्या सोने खरेदी करणे हा एक चांगला पर्याय आहे. ट्रम्प यांनी शुल्क लादले आहे, भू-राजकीय तणाव सुरूच आहे, जागतिक बाजारपेठेत चढ-उतार तसेच आहेत आणि अनेक देशांमध्ये युद्ध सुरू आहे. अशा परिस्थितीत, शक्य तितके सोने खरेदी करून साठवले पाहिजे. आता सोने खरेदी करण्याची वेळ आहे, ते विकण्याची नाही.

**जागतिक बाजारपेठेत सोन्याच्या किमतींचा कल**

कोणत्याही देशातील सोन्याची किंमत त्याच्या आंतरराष्ट्रीय दराच्या आधारे ठरवली जाते. आंतरराष्ट्रीय स्तरावर, लंडन बुलियन मार्केट असोसिएशन सोन्याची किंमत निश्चित करते आणि नियंत्रित करते. ते इतर देशांशी जवळून काम करते. २४ कॅरेट शुद्धतेच्या सोन्याचा प्रति औंस दर डॉलरमध्ये निश्चित केला जातो. एक औंस २८.३ ग्रॅम आहे.

एलबीएमएनुसार, जानेवारीमध्ये सोन्याची किंमत प्रति औंस $२,६३३ होती, जी एप्रिलपर्यंत वाढून $३,२३० प्रति औंस झाली. औंस झाले. या काळात सोन्याच्या किमतीत चढ-उतार दिसून आले. फेब्रुवारीमध्ये सोन्याची सर्वाधिक किंमत $२,९३६ प्रति औंस होती, तर मार्चमध्ये सर्वात कमी $२,८८० प्रति औंस होती. तथापि, एप्रिलनंतर त्यात सतत वाढ दिसून आली. ८ ऑगस्ट रोजी सोन्याची किंमत $३,३८३ प्रति औंस होती.

**सोने महागणार की स्वस्त होणार?**

वेल्थ रिसर्च अँड अॅडव्हायझरी' या गुंतवणूक फर्मचे संचालक अनुज गुप्ता यांच्या मते, २०२५ मध्येही किंमती वाढतच राहतील. या वर्षीच सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅम १.१० लाख रुपयांच्या पुढे जाऊ शकतो. आंतरराष्ट्रीय स्तरावर सोन्याचा भाव प्रति औंस ३,५०० डॉलर्स असू शकतो. याची ३ मुख्य कारणे आहेतः

**ट्रम्प यांची सततची टॅरिफ वाढ :**
ट्रम्प यांनी भारतावर ५०% आणि स्वित्झर्लंडवर ३९% टॅरिफ लादला. यामुळे जगभरातील सोन्याच्या पुरवठ्यावर परिणाम होत आहे. स्वित्झर्लंड आता अमेरिकेत कमी सोने आयात करेल, ज्यामुळे जागतिक बाजारात सोन्याचे भाव वाढतील. यामुळे भारतातील सोन्याचा आयात खर्चही वाढेल.

**भारतातील सणांचा हंगाम :**
धनतेरस, दिवाळी आणि लग्नाचा हंगाम ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये सुरू होईल, त्यामुळे भारतात सोन्याची मागणी वाढेल. भारत दरवर्षी ८०० टन सोने खरेदी करतो आणि सणांच्या काळात त्याचा वाटा ३०% असतो.

आयबीजेएच्या मते, २०२४ मध्ये धनतेरस दरम्यान सोन्याच्या किमती प्रति १० ग्रॅम २००० रुपयांनी वाढल्या. लग्नसराईच्या काळात भारतात सोन्याची मागणी वाढेल.

**फेडरल रिझर्व्ह व्याजदर कमी करू शकते:**
अमेरिकन फेडरल रिझर्व्ह बँक व्याजदर कमी करू शकते, ज्यामुळे भविष्यात सोन्याच्या किमती वाढतील. व्याजदर वाढल्यामुळे सोन्याची खरेदी कमी झाली आहे कारण ते कमी नफा देते. सध्या यूएस फेडरल रिझर्व्हचे लक्ष्य ४.२५% ते ४.५०% दरम्यान आहे.

अनुज गुप्ता यांच्या मते, ₹ट्रम्प यांच्या टॅरिफ वॉरमुळे तांबे आणि अॅल्युमिनियमसारखे अनेक धातू अजूनही महाग होतील. तांबे आणि अॅल्युमिनियमसोबतच चांदीचा वापर उद्योगांमध्येही केला जातो. अशा परिस्थितीत चांदीची मागणी वाढली आहे.

चांदीचा वापर केवळ दागिने आणि गुंतवणुकीसाठीच केला जात नाही, तर ती उद्योगांमध्येही वापरली जाते. जेव्हा या उद्योगांमध्ये उत्पादन वाढते तेव्हा चांदीची मागणीदेखील वाढते. सिल्व्हर इन्स्टिट्यूटच्या आकडेवारीनुसार, २०२३-२५ मध्ये चांदीची मागणी २०% वाढण्याची अपेक्षा आहे.

'एसएस वेल्थ स्ट्रीट' या वित्तीय कंपनीच्या संचालिका सुगंधा सचदेवा म्हणतात की, सोलर पॅनेल, इंटरनेटची ५जी तंत्रज्ञान आणि इलेक्ट्रॉनिक वस्तूंची वाढती मागणी यांचा चांदीच्या किमतीवर परिणाम होईल. पुढील काही महिन्यांत भारतीय बाजारपेठेत चांदीची किंमत १.२५ लाख रुपये प्रति किलोपेक्षा जास्त होईल.

---

# घरी आलेले इन्कमटॅक्स अधिकारी सर्व्हेक्षणाचे रूपांतर धाडीत करू शकतात का?

**सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट**

सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा
सीए. आकाश जी. मुंदडा
जालना.

गेल्यावेळेस आपण सर्व्हेबद्दल सविस्तर जाणून घेतले. आज सविस्तर चर्चा करणार आहोत की, सर्व्हे करण्यासाठी आलेले इन्कमटॅक्स अधिकारी त्या सर्व्हेला धाडीत रुपांतर करू शकतात का? हे आपण सोप्या भाषेतील प्रश्नोत्तर रुपात बघणार आहोत.

**प्रश्न** - सर्व्हेक्षण साठी आलेले इन्कमटॅक्स अधिकारी स्वेच्छाने सर्व्हेक्षणाचे रुपांतर धाडीत करू शकतात का?

■ सर्व्हेक्षण म्हणजे दुसऱ्या भाषेत सर्व्हे म्हणतात. यालाच आपण सोप्या भाषेत तपासणी म्हणू शकतो. आता वरील प्रश्नाचा अर्थ असा आहे की फक्त तपासणीसाठी आलेले इन्कमटॅक्स अधिकारी त्या तपासणी कारवाईला वाढवून त्याचे रुपांतर धाडीत करू शकतात का?

यासाठी मोतीलाल अँड सन्स विरुद्ध डीपार्टमेन्ट ऑफ इन्कमटॅक्स (I.T.A. No. 1082 (Del) of 2007) या केसचा संदर्भ बघणे गरजेचे आहे. या केसमध्ये मोतीलाल अँड सन्स या करदात्याचा सर्व्हे चालू होता. त्यांच्या तपासणीमध्ये इन्कमटॅक्स अधिकारी यांना बुक्स ऑफ अकांउट (पुस्तके) मध्ये ४८,४३,७४८/- रुपयांचा फरक दिसून आल्याने अधिकाऱ्याने लगेच सर्व्हेचे रुपांतर धाडीत केले.




मोतीलाल अँड कम्पनी यांनी इन्कमटॅक्स डिपार्टमेन्टच्या या निर्णयाच्या विरोधात ट्रीन्युनलमध्ये अपील केले. तेथे कंपनीने सांगितले की, सोन्याच्या बांगड्या, अंगठ्या तथा ब्रासलेट याचा स्टॉक ५ कोटीच्या वर आहे. इन्कमटॅक्सवाल्यांनी याचे ग्रॉस वजन म्हणजे Gross weight धरले आहे जे की सारासर चुकीचे आहे.

निव्वळ वजन म्हणजे Net weight डीपार्टमेन्टने घेतले नसल्यामुळे त्यांना ४८,४३,७४८/- इतक्या रकमेचा फरक सापडत आहे. त्यात डोरी, आर्टीफिशियल (नकली) स्टोन आणि लाख (एक धातु) याचे वजन कमी केलेले नाही. मोतीलाल कंपनीचे तर्क झवितर्क दिल्ली ट्रिब्युनलमध्ये यांनी मान्य केले तथा इन्कमटॅक्स अधिकाऱ्याने केलेली केस रद्द करून संपूर्ण टॅक्सची अतिरिक्त मागणी रद्द केली.

इतकेच नाही तर दिल्ली कोर्टाने इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांवर ताशेरेही ओढले. त्यांनी सांगितले की, इन्कमटॅक्स अधिकारी अशी मनमानी तथा स्वेच्छाचारी कार्य करू शकत नाहीत. कोर्टाने ताशेरे ओढतांना Arbitrary हा शब्द वापरला तथा आदेशामध्ये म्हंटले की

"Sometimes, a Survey is Converted into a search operation But it should not be arbitrarily done, as in this Case." म्हणजेच इन्कमटॅक्स वाल्यांनी सर्वेक्षणाला धाडीत बदलतांना मनमानी कारभार करू नये.

**प्रश्न** - एस. पी. कार्थिक या केसमध्ये मद्रास हायकोर्टाने धाडीबद्दल काय निर्णय दिला?

■ एस.पी. कार्थिक विरुद्ध कमीशनर ऑफ इन्कमटॅक्स (2023) 147 taxman.com 287 (Mad) या केस ची माहिती अशी की सर्च मध्ये करदात्याने अधिकाऱ्यांना खूप समजवण्याचा प्रयत्न केला की जी एकूण ज्वेलरी जप्त करण्यात आली आहे, त्यापैकी काही भाग वडिलोपार्जित आहे. परंतु, अधिकाऱ्यांनी त्या म्हणण्यास दाद दिली नाही व टॅक्स लावले. परंतु असे Revenue चे म्हणणे होते की त्यांना तसा पुरावा पाहिजे होता; जो करदात्याकडे नव्हता.

कार्थिक यांनी वेल्थ टॅक्स रिटर्नबद्दल माहितीत सांगितले की, १-४- ९२ पासून संपती कर लागू नसल्यामुळे त्यांना रिटर्न भरण्याची गरज पडली नाही. मद्रास उच्च न्यायालयाने त्यांच्याकडील जप्त झालेल्या १०३५.९५ ग्रॅम ज्वेलरीपैकी 450 ग्रॅम हे वडिलोपार्जित म्हणून सोडण्यात आले तथा उर्वरित ५८५.९५ ग्रॅम हे unexplained ज्वेलरी असे धरून यावर टॅक्स लावण्यात आले. तसेच १२.०५ कॅरेटचे हिरे (डायमंड ) ज्वेलरी यास मान्य करून उर्वरित २.०५ कॅरेट हिरे जवाहरातवर Unexplained Diamond म्हणून टॅक्स लावण्याची अनुमती दिली.

पुढील लेखमालेत आपण आणखी कोर्टाच्या नवीन निर्णयाची माहिती जाणून घेणार आहोत. ज्यामुळे आपल्या निदर्शनास येईल की, इन्कमटॅक्समध्ये जास्त घाबरायाचे कारण नसते. प्रत्येक गोष्टीचा पुरावा तथा उहापोह केल्यास इन्कमटॅक्स अधिकारी करदात्याचे म्हणणे ऐकतात. जर त्यांनी करदात्याच्या म्हणण्यास दाद दिली नाही तर कोर्टात न्याय मिळण्याची शक्यता जास्त असते.

ज्या वाचकांना काही प्रश्न विचारायचे असतील त्यांनी आपल्या पुर्ण नावासह 9422218428 या नंबरवर फक्त whatsapp message करावे म्हणजे त्यांची उत्तरे निःशुल्क लेखमालेत प्रसिध्द केली जाईल. ■ ■ ■

---

# कैद्यांना पेट्रोल पंपावर काम करण्याची शिक्षा



आगळंवेगळं

हरियाणा सरकारने एक अनोखा उपक्रम सुरू केला आहे. आता करनालसह अनेक जिल्ह्यांमधील तुरुंगाबाहेरील पेट्रोल पंप कैदी चालवत आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे आतापर्यंत एकही कैदी येथून पळून गेलेला नाही.

या उपक्रमामुळे कैद्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात पुन्हा सामील होण्याची संधी मिळते. तुरुंग अधीक्षकांच्या मते, या कामासाठी फक्त चांगल्या सवयी असलेल्या कैद्यांची निवड केली जाते. ते सकाळी ७ ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत काम करतात आणि दररोज ९०-१०० रुपये कमवतात, जे थेट त्यांच्या खात्यात जमा केले जातात. हरियाणाचे डीजीपी जेल मोहम्मद अकील यांनी याला 'जीवन बदलणारा उपक्रम' असे वर्णन केले आहे. अंबाला, यमुनानगर आणि हिसार सारख्या शहरांमध्येही याची पुनरावृत्ती झाली आहे. ■ ■

---

# मराठमोळा सुपरस्टार!

अभय गोखले

बंगलोरमध्ये राज्य परिवहन महामंडळाच्या बसमध्ये कंडक्टरची नोकरी करणारा एक युवक मोठे स्वप्न उराशी बाळगून मद्रासमध्ये गेला आणि त्याची गाठ सुप्रसिद्ध दिग्दर्शक के बालचंदर यांच्याशी पडली. के.बालचंदर यांनी त्या युवकाला अपूर्व रागंगळ या आपल्या चित्रपटात एक छोटासा रोल दिला. त्या छोट्याशा रोलमध्येही त्या युवकाने आपली आगळीवेगळी छाप पाडली आणि तेथून सुरू झालेला त्याचा प्रवास सुपरस्टारच्या शिखरापर्यंत पोहोचला.

विशेष म्हणजे अपूर्व रागंगळ या चित्रपटात कमल हासन यानेही काम केले होते. हा चित्रपट जेंव्हा बंगलोरमध्ये रिलीज झाला तेंव्हा तो पाहण्यासाठी तो युवक जेंव्हा चित्रपटगृहात गेला तेंव्हा त्याला आपले अश्रू आवरता आले नाहीत. अर्थात ते आनंदाश्रू होते. अखेर रूपेरी पडद्यावर त्याची एंट्री झाली होती. त्यानंतर त्याने कधीच मागे वळून पाहिले नाही.

शिवाजीराव गायकवाड, अस्सल मराठमोळा माणूस. शिवाजीरावचा रजनीकांत कसा झाला, याची कहाणी अद्भूत आहे. दिग्दर्शक के बालचंदर यांनी जेंव्हा त्याला आपल्या चित्रपटात काम दिलं तेंव्हा त्यांच्या लक्षात आलं की तामिळ चित्रपट सृष्टीत शिवाजी नावाचे सुपरस्टार आहेत, ते म्हणजे शिवाजी गणेशन. त्यामुळे त्यांनी शिवाजीराव हे नाव बदलण्याचे ठरवले. त्यांनी त्याच्यासमोर तीन पर्याय ठेवले. श्रीकांत, चंद्रकांत आणि रजनीकांत असे तीन पर्याय होते. दिग्दर्शक के.बालचंदर यांनी पुर्वी दिग्दर्शित केलेल्या मेजर चंद्रकांत या चित्रपटात रजनीकांत नावाचे एक पात्र होते. त्यावरून रजनीकांत हे नाव शिवाजीराव यांना प्रदान करण्यात आले.अशा प्रकारे रजनीकांत या नावाचा जन्म झाला.



तामिळनाडूमध्ये चित्रपट सृष्टीतील नट नट्यांची मोठी क्रेझ आहे. शिवाजी गणेशन, एम.जी.रामचंद्रन, जयललिता, विजयकांत, कमल हासन आणि रजनीकांत या कलाकारांचे मोठ्या प्रमाणात फॅन्स आहेत. त्यांचे फॅन्स क्लब आहेत. यापैकी रजनीकांत याचा अपवाद वगळता इतर सर्व कलाकार राजकारणात सक्रिय झाले.एम.जी. रामचंद्रन आणि जयललिता हे कलाकार तामिळनाडूचे मुख्यमंत्री होते. रजनीकांत हे राजकारणात प्रवेश करणार असल्याच्या चर्चा बऱ्याच वेळा झाल्या परंतु त्या शेवटी चर्चाच राहिल्या.

वरील स्टार कलाकारांच्या फॅन्सनी आपल्या आवडत्या कलाकारांची मंदिरेही बांधली. सुपरस्टार रजनीकांत याच्या काही चाहत्यांनी मध्यंतरी तामिळनाडू मधील मदुराई येथे रजनीकांतचे एक मंदिर बांधले आहे. या मंदिरात रजनीकांत याची ३०० किलो वजनाची मूर्ती बसवण्यात आली आहे.

रजनीकांतच्या एका चाहत्याने त्याच्या चित्रपट कारकिर्दिला ५० वर्षे पूर्ण झाली, या निमित्ताने त्या मंदिरात जाऊन, मूर्तीची विधिवत पूजा करून, मूर्तीला अभिषेक केला. एवढेच नव्हे तर त्याने रजनीकांतच्या निरनिराळ्या चित्रपटांतील छायाचित्रांनी ते मंदिर सजवले.

अशा प्रकारे अपूर्व रागंगळ या चित्रपटात १९७५ साली छोटीशी भूमिका करुन, तामीळ चित्रपट सृष्टीत प्रवेश करणाऱ्या रजनीकांतच्या चित्रपट कारकिर्दीला ५० वर्षे पूर्ण होत असताना, रजनीकांतची लोकप्रियता नवनवीन उच्चांक गाठत आहे. त्याच्या पुढील वाटचालीसाठी त्याला भरभरून शुभेच्छा. ■ ■ ■

---



# कबुतरांमुळे खरोखरंच आरोग्याला धोका?

दादरच्या कबुतरखाना हटवण्यावून जैन समाज आक्रमक झालेला दिसत आहे. जैन धर्मात कबुतरांना फार महत्त्वाचं स्थान देण्यात आलं आहे. तसेच काहीजणांना ती सवयही असते की कबुतरांसाठी धान्य खायल टाकायला जाणे. पण खरं पाहायला गेलं तर कबुतरांमुळे अनेक आजार पसरतात असं म्हटलं जातं. पण तुम्हाला माहिती आहे कबुतरांच्या संपर्कात राहणे म्हणजे स्वतःसाठी तसेच परिसरातील इतर लोकांसाठीही आरोग्यासाठी मोठा धोका निर्माण करणे.

हा आजार जो कधीकधी प्राणघातक ठरू शकतो. याचचं एक उदाहरण म्हणजे दिल्लीतील एका ११ वर्षाच्या मुलाला श्वास घेण्यास त्रास होत असल्याने सर गंगाराम रुग्णालयात दाखल करण्यात आले. सुरुवातीच्या तपासणीत डॉक्टरांना आढळले की त्या मुलाच्या फुफ्फुसात जळजळ आहे. त्यानंतर त्या मुलाची वैद्यकीय तपासणी करण्यात आली, ज्यामध्ये असे आढळून आले की त्या मुलाला हायपरसेंसिटिव्हिटी न्यूमोनिटिस नावाचा एक दुर्मिळ फुफ्फुसाचा आजार झाला आहे.

हा एक प्रकारचा न्यूमोनिया आजार आहे, जो कधीकधी प्राणघातक ठरू शकतो. डॉक्टरांना तपासणीत असे आढळून आले की फुफ्फुसांची ही गंभीर अॅलर्जीची समस्या मुलगा कबुतरांच्या विष्ठा आणि पंखांच्या संपर्कात बराच काळ राहिल्यामुळे झाली आहे.

**हायपरसेंसिटिव्हिटी न्यूमोनिटिस म्हणजे काय?**

कबुतरांमुळे होणारा हा आजार दरवर्षी कबुतरांच्या संख्येसह वाढत आहे. संशोधनानुसार, एक कबुतर वर्षाला ११.५ किलो शौच करतो. कबुतरांच्या शौचांशी संबंधित आजारांमध्ये क्रिप्टोकोकोसिस, हिस्टोप्लाज्मोसिस आणि सायटाकोसिस यांचा समावेश आहे. शौच साफ करताना निर्माण होणाऱ्या धुळीत श्वास घेतल्याने तुम्हाला या आजारांची लागण होऊ शकते. हायपरसेंसिटिव्हिटी न्यूमोनिटिस हा एक अतिशय धोकादायक आजार आहे. तो तीव्र झाला तर श्वास घेण्यास त्रास, खोकला, ऑक्सिजनची पातळी कमी होणे व सांधेदुखी होऊ शकते.

**हायपरसेंसिटिव्हिटी न्यूमोनिटिसचा धोका कोणाला जास्त असतो?**


कबुतर आणि इतर पक्ष्यांच्या संपर्कात येणाऱ्या लोकांना हा संसर्ग होण्याचा धोका जास्त असतो. हायपरसेंसिटिव्हिटी न्यूमोनिटिस पक्ष्यांच्या विष्ठा, मूत्र आणि त्यांनी सोडलेल्या अन्नाच्या कणांच्या संपर्कात येणाऱ्या लोकांना देखील होतो.

**त्वचारोग** : कबुतरांमुळे फक्त फुफ्फुसाचाच आजार नाही तर त्वचारोग देखील होऊ शकतो. कबुतरांच्या पिसांमुळे किंवा त्यांच्या पिसांमध्ये असणाऱ्या छोट्यामोठ्या किटकांमुळे त्वचारोग देखील होऊ शकतो. त्यामुळे कबुतरांना खायला देणे हे जरी एक चांगली सवय असली तरी देखील त्यामुळे आपल्या आरोग्याला होणारा धोका देखील होऊ शकतो ही बाब लक्षात घेतली पाहिजे. ■ ■ ■

---

**अशोकायन**

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## मी निर्भया बोलतेय!

शिवरायांच्या कर्मभूमित
महिलांवर होती अत्याचार
परस्त्री मातेसमानचे
लोप पावलेत का संस्कार?

माणसाच्या मनात
वसतो सुप्त सैतान
निर्भया म्हणते
भगीनींनो रहा सावधान..!

राखी पोर्णिमेच्या दिवशी
भावाला मागा ओवाळणी
कोणत्याही परस्त्रीची
करणार नाही छेडखानी..!

आई बहीण पत्नी
तुम्हालाही आहे
'मानव ' म्हणून जगण्याचे
कधी शिकणार आहे?

## 'द सॉलिटेअर फेस्टिव्हल ऑफ इंडिया' द्वारे जीवनाच्या उत्सवात अधिक तेजस्वीपणा आणत आहे



**नागपूर, ९ ऑगस्ट :** भारतातील आघाडीच्या ज्वेलरी ब्रँडपैकी एक, डिव्हाईन सॉलिटेअर, त्यांच्या बहुप्रतिक्षित सॉलिटेअर फेस्टिव्हलची चौथी आवृत्ती - 'द सॉलिटेअर फेस्टिव्हल ऑफ इंडिया' घेऊन येत आहे. हा महोत्सव १ ते ३१ ऑगस्ट २०२५ दरम्यान १००+ शहरांमधील ब्रँडच्या भागीदार रिटेल स्टोअरमध्ये आयोजित केला जात आहे. हा महोत्सव हिऱ्यांच्या खरेदीच्या अनुभवात उत्साह, चमक आणि उत्सव आणेल.

'द सॉलिटेअर फेस्टिव्हल ऑफ इंडिया' द्वारे, डिवाइन सॉलिटेअर जीवनातील सर्वात खास आणि दैवी क्षणांना उंचावून दाखवते - जसे की प्रेमाची कबुली, एखादी कामगिरी किंवा संस्मरणीय क्षण - आणि प्रत्येक सॉलिटेअर खरेदीवर ग्राहकांना एक आनंददायी आश्चर्य म्हणून खात्रीशीर भेटवस्तू देखील देते.

भेटवस्तू स्पिन द व्हील, पिक १ ऑफ थ्री सरप्राईज किंवा पुढील खरेदीवर डिवाइन व्हाउचरच्या स्वरूपात असू शकतात.

उत्साह इथेच थांबत नाही! - ग्राहक साप्ताहिक मेगा ड्रॉमध्ये आयफोन, वॉशिंग मशीन, लॅपटॉप, पीएस५ आणि एक कार जिंकू शकतात - ड्रॉ ११, १८ आणि २५ ऑगस्ट रोजी होतील. बंपर ड्रॉ ३ सप्टेंबर रोजी होईल, जिथे भाग्यवान विजेत्यांना एक लक्झरी एसयूव्ही आणि एसी, रेफ्रिजरेटर आणि टीव्ही सारखी उच्च दर्जाची गृह उपकरणे मिळतील.

डिव्हाईन सॉलिटेअरचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक जिग्नेश मेहता म्हणाले: डिव्हाईन सॉलिटेअर हिरा हा केवळ एक मौल्यवान रत्न नाही, तर तो एखाद्याच्या कथेचे प्रतीक आहे - एक भावना जी या खरेदीद्वारे व्यक्त होते. 'द सॉलिटेअर फेस्टिव्हल ऑफ इंडिया' चे उद्दिष्ट प्रत्येक खरेदीला आश्चर्य आणि आनंद देऊन ती भावना अधिक तीव्र करणे आहे. ग्राहक केवळ एका सुंदर हिऱ्यासहच नव्हे तर उत्सवाचा भाग म्हणून घरी परततात.

'द सॉलिटेअर फेस्टिव्हल ऑफ इंडिया' हा ब्रँडच्या केवळ दागिनेच नव्हे तर विश्वास, भावना आणि उत्सवात बुडलेला अनुभव देण्याच्या वचनबद्धतेचा विस्तार आहे.

## दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च (डीयू) च्या इंटीग्रेटेड मेडिसिन क्षेत्राला राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळवण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल

**नागपूर, ९ ऑगस्ट :** दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च (डीम्ड टू बी युनिव्हर्सिटी) डीएमआयएचईआर (डीयू) च्या ऑफ कॅम्पसला नुकतीच एक सन्माननीय भेट मिळाली. नवी दिल्लीतील सेंट्रल कौन्सिल फॉर रिसर्च इन होमिओपॅथी (सीसीआरएच) येथील संशोधन अधिकारी आणि इंडियन जर्नल ऑफ रिसर्च इन होमिओपॅथीच्या संपादक डॉ. हरलीन कौर यांनी येथे भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी १,०२० बेड्सच्या शालिनीताई मेघे हॉस्पिटल, कॉलेज अँड रिसर्च सेंटर (एसएमएचएचसीआरसी) या मल्टी-सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलला भेट दिली. हे हॉस्पिटल दत्ता मेघे मेडिकल कॉलेजशी संलग्न असून, डीएमआयएचईआर (डीयू) चा एक महत्त्वाचा भाग आहे.

डॉ. कौर यांनी डीएमआयएचईआर (डीयू) ऑफ कॅम्पसमध्ये असलेल्या शालिनीताई मेघे होमिओपॅथी हॉस्पिटल, कॉलेज अँड रिसर्च सेंटरलाही भेट दिली. हे संस्थान देखील युनिव्हर्सिटीचा एक महत्त्वाचा भाग आहे. डीएमआयएचईआर (डीयू) ही भारतातील सर्वोच्च मानांकन मिळालेल्या एनएएसी मान्यताप्राप्त आरोग्य विद्यापीठांपैकी एक असून, ही संस्था शैक्षणिक गुणवत्ता, आरोग्यसेवेतील नवकल्पना आणि बहुविषयक संशोधन उपक्रमांसाठी ओळखली जाते.

डॉ. कौर यांच्या या भेटीचा मुख्य उद्देश म्हणजे येथे उपलब्ध असलेल्या सुविधा पाहणे आणि होमिओपॅथीमध्ये संयुक्त संशोधन प्रकल्प करण्याच्या शक्यता शोधणे हा होता. त्यांनी सांगितले की, आजच्या आरोग्य व्यवस्थेत पारंपरिक (ॲलोपॅथी) आणि पर्यायी (होमिओपॅथी, आयुर्वेद इ.) उपचारपद्धतींचा वैज्ञानिक पद्धतीने एकत्रित वापर म्हणजेच इंटीग्रेटेड मेडिसिन ही संकल्पना आहे, जी रुग्णकेंद्रित आणि सर्वांगीण उपचार देण्यासाठी खूप उपयुक्त ठरू शकते. त्यांनी असेही नमूद केले की, होमिओपॅथी आणि ॲलोपॅथी यासारख्या उपचारपद्धती एकत्रित आणि प्रभावीपणे वापरण्यासाठी पुराव्यावर आधारित संशोधन खूप महत्त्वाचे आहे. यामुळे उपचाराचे परिणाम चांगले मिळतात, रुग्णांचे समाधान वाढते आणि आजारांचा भारही कमी होतो. अशा प्रकारचे संयुक्त प्रयत्न पारंपरिक ज्ञान आणि आधुनिक विज्ञान यांच्यातील अंतर कमी करतात आणि आरोग्य सेवेत नवकल्पनांना चालना देतात.

डॉ. कौर यांनी इंटीग्रेटेड मेडिसिन क्षेत्रात संशोधनाला चालना देण्यासाठी डीएमआयएचईआर (डीयू) च्या नेतृत्वाने घेतलेल्या पुढाकाराचे कौतुक केले आणि या सहकार्याला पुढे नेण्याची तयारी दर्शवली.

भेटीनंतर डीएमआयएचईआर (डीयू) ऑफ कॅम्पसचे संचालक डॉ. अनुप मरार यांनी डॉ. कौर आणि त्यांच्या टीमचा सत्कार केला आणि व्यापक जनतेच्या फायद्यासाठी इंटीग्रेटेड मेडिसिनच्या उपक्रमांना अधिक बळकट करण्यासाठी दिलेल्या प्रेरणेबद्दल आभार मानले.

डॉ. कौर यांनी डीएमआयएचईआर (डीयू) च्या खास इंटीग्रेटेड क्लिनिकल प्रॅक्टिस मॉडेलचे विशेष कौतुक केले, ज्यामध्ये आयुर्वेद, ॲलोपॅथी, होमिओपॅथी, योग, आहारशास्त्र अशा उपचार पद्धती आणि प्रत्येक नवीन रुग्णासाठी विविध तज्ज्ञ डॉक्टरांची एकत्रित भेट घेण्याची सुविधा आहे. त्यांनी सांगितले की, रुग्णसेवेची ही पद्धत देशभरात लागू करता येईल अशी आहे आणि केंद्र सरकारला दाखवण्यासारखे एक आदर्श उदाहरण आहे.

या भेटीचे समन्वयक डॉ. प्रशांत भारबत (प्राचार्य एसएमएचएचसीआरसी) होते. त्यांच्यासोबत डॉ. नंदकिशोर बांकर, डॉ. मनीष देशमुख, डॉ. विनोद खवसे आणि एसएमएचएचसीआरसी आणि एसएमएचआरसी यांच्या समर्पित टीमनेही सहभाग घेतला. या टीमने युनिव्हर्सिटीची संशोधन क्षेत्रातील क्षमता सादर केली आणि वैज्ञानिक आधार असलेल्या इंटीग्रेटेड मेडिसिनला पुढे नेण्यासाठी संस्थेची वचनबद्धता पुन्हा अधोरेखित केली.

## छोरियाँ चली गांवमध्ये अनिता, कृष्णा आणि समृद्धी ग्रामीण भागातील मुलांच्या शिक्षणासाठी बनल्या एक आवाज

**मुंबई, ९ ऑगस्ट :** झी टीव्हीवरील नवा प्राइमटाईम रिॲलिटी शो छोरियाँ चली गाँव रणविजय सिंघाच्या सूत्रसंचालनाखाली एक जिवंत आणि भावनिक प्रवास घडवतो जिथे ११ सेलिब्रिटी स्पर्धक ग्रामीण भारताच्या खऱ्या आयुष्याशी जिद्दीने थेट भिडतात. आपल्या झगमगाटी शहरी जीवनापासून दूर जाऊन अनिता हसानंदानी, कृष्णा श्रॉफ, समृद्धी मेहरा, ऐश्वर्या खरे, रमीत संधू, अंजुम फकीह, रेहा सुखेजा, डॉली जावेद, सुमुखी सुरेश, सुरभी मेहरा आणि एरिका पॅकार्ड हे सर्व पारंपरिक भारतीय गावाच्या दैनंदिन जीवनात पूर्णपणे सहभागी होतात मग ते म्हशींचे दूध काढणे असो, चुलीवर स्वयंपाक करणे, कोंबड्या पकडणे किंवा आपल्या सवयींच्या पलीकडची कामे करत आत्मिक आणि शारीरिक जिद्द सिध्द करणे असो.

मात्र या मजेशीर कार्यांपलीकडे आणि दररोजच्या आव्हानांपलीकडे छोरियाँ चली गाँव मध्ये एक खूपच अर्थपूर्ण गोष्ट घडते आहे. गावकऱ्यांच्या घरांमध्ये त्यांच्यासोबत राहताना, अनिता हसानंदानी, कृष्णा श्रॉफ आणि समृद्धी मेहरा या तिघींना माणुसकीची खरी ताकद आणि सामुदायिकतेचे खरे मूल्य अनुभवायला मिळत आहे. कृष्णा आणि समृद्धीने त्या घरातील मुलांसाठी मार्गदर्शकाची भूमिका स्वीकारली आहे, त्या त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत आहेत. त्या मुलांना सकाळी उठवणे, त्यांना शाळेसाठी तयार होण्यासाठी मदत करणे आणि सतत हे आठवण करून देणे की शिक्षण हेच उज्वल भविष्यासाठीचे खरे शस्त्र आहे हे सगळे त्या मनापासून करत आहेत. त्यांचा हा प्रयत्न केवळ टास्क पूर्ण करण्यापुरता मर्यादित नसून त्यामागे एक खोल काळजी आणि शिक्षणावर असलेला त्यांचा नितांत विश्वास आहे.

कृष्णा श्रॉफ मुलांशी बोलताना म्हणाली, तुम्ही खरंच खूप नशिबवान आहात की तुमची आई तुमचे शिक्षण होण्यासाठी प्रयत्नशील आहे. कधीही शाळेला उशीर करू नका त्या काही तासांचा वेळ खूप मौल्यवान असतो. शाळा ही नेहमी तुमचे पहिले प्राधान्य असायला हवी. ती वेळ तुम्हाला केवळ पुस्तकांचेच नाही, तर आयुष्याचेही शिक्षण देईल. गावांमधल्या मुलींना नेहमीच अशी संधी मिळत नाही, त्यामुळे ती संधी कधीही वाया जाऊ देऊ नका.

दरम्यान, अनिता हसानंदानी जी तिच्या पडद्यावरच्या आणि पडद्यामागच्या उबदार स्वभावासाठी ओळखली जाते हिने आपल्या होस्ट गावात ज्या घरात ती राहत आहे, त्या घरातील मुलांशी एक हळवे आणि खोल भावनिक नाते निर्माण केले आहे. या मुलांनी त्यांच्या आईला गमावले आहे आणि तरीही त्यांच्यात असलेली जिद्द, सामर्थ्य आणि शिकण्याची इच्छाशक्ती पाहून अनिता खूप भारावून गेली. त्यांच्या शिक्षणाच्या प्रवासात येणाऱ्या अडचणींनी तिच्या मनाला स्पर्श केला, आणि या मुलांसाठी ती फक्त शोमध्येच नाही तर त्याच्या पलीकडे जाऊनही पाठिंबा देत आहे.

अनिता हसानंदानी म्हणाली, जर या मुलांना त्यांच्या शिक्षणासाठी कधीही कुठल्या मदतीची गरज भासली, तर मी त्यांच्यासाठी माझा नंबर ठेवून जाईन. मी खूप मनापासून त्यांना मदत करू इच्छिते, आणि शक्य तितक्या प्रकारे त्यांना साथ द्यायला तयार आहे.

या मुलांनी त्यांची आई गमावली आहे, आणि त्यांचा मोठा भाऊ जबाबदारी घेऊन उभा राहिला आहे कारण त्यांचे वडील अजूनही त्या दुःखातून सावरत आहेत.

## अमृतांजन हेल्थकेअरने सलग चौथ्या वर्षी पंढरपूरवारीतील वारकऱ्यांना आरोग्यसेवा दिली




**पंढरपूर, ९ ऑगस्ट :** महाराष्ट्रातील पंढरपुरवारीत अमृतंजन हेल्थकेअर लिमिटेडने वारक-यांसाठी आरोग्यसेवा दिली. जुलै महिन्यात पार पडलेल्या या धार्मिक कार्यात वारक-यांसाठी आरोग्य सेवा पुरवत अमृतांजन हेल्थकेअर लिमिटेडने सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवले आहे. ही वारी देशातील प्रतिष्ठित आध्यात्मिक यात्रांपैकी महत्त्वाची यात्रा मानली जाते. अमृतांजन हेल्थकेअरने १ जुलै ते जुलै या काळात हजारो वारक-यांसाठी आरोग्यसेवा दिली. कित्येक किलोमीटर पायी चालणा-या वारक-यांना आरोग्य सेवा मिळाल्याने त्यांच्या शारिरीक वेदना कमी झाल्या. वारक-यांना यात्रेदरम्यान होणारा त्रास कमी झाल्याने त्यांचा हा प्रवास सुखकर झाला. गेल्या चार वर्षांपासून आरोग्यसेवा देण्यासाठी अमृतांजन वारीमध्ये सहभागी होत आहे. हा कायमस्वरुपी सहभाग अमृतांजनने वारक-यांसाठी सुरु केलेल्या या उपक्रमातील आरोग्य, विश्रांती आणि कल्याण या मूल्यांवरील त्यांच्या विश्वासाचे प्रतीक आहे. समाजाला ज्यावेळी गरज भासते त्यावेळी अमृतांजन हेल्थकेअर समाजाला मदत करण्यातासाठी सदैव तत्पर असतो, ही वचनबद्धता या उपक्रमातून दिसून आली.

पंढरपूरवारीत वारक-यांना आरोग्यसेवा देण्याच्या उपक्रमाबाबत अमृतांजन हेल्थकेअरचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक एस.संभू प्रसाद यांनी आपली भूमिका मांडली. ते म्हणाले, लोकांच्या आयुष्यातील महत्त्वाच्याक्षणी त्यांची सेवा करण्यावर उपक्रम राबवणे हा अमृतांजनचा वारसा आहे. लोकांच्या दैनंदिन आयुष्यासह वारीसारख्या धार्मिक यात्रेतही आम्ही त्यांना सेवा देतो. पंढरपूरवारी ही अध्यात्मिक वारी शारिरीकदृष्ट्या आव्हानात्मक ठरते. या वारीत सहभागी होणा-या वारक-यांना पाठिंबा देणे ही आमची जबाबदारी आहे. वारक-यांना आरोग्यसेवा देणे आमच्यासाठी सन्मानाची बाब आहे. केवळ उदाहरण म्हणून हा उपक्रम राबवला जात नाहीये. आम्ही हा उपक्रम वारक-यांसाठी असलेली काळजी, त्यांच्या एकतेचा सन्मान करण्यासाठी करत आहोत. आपल्या ग्राहकांबाबत सहानुभूती असल्याने हा उपक्रम राबवला जात आहे. काळजी आणि आरोग्यावर आधारलेला ब्रॅंण्ड म्हणून आम्हाला सलग चौथ्या वर्षी वारक-यांच्या वेदना कमी करण्यासाठी तसेच त्यांना डायड्रेशन सोल्यूशन्स देण्याचे भाग्य लाभले.

या उद्देशपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून अमृतांजन हेल्थकेअर आपल्या ग्राहकांशी असलेले नाते अधिक दृढ करत आहे. परंपरा, विश्वास आणि नवनिर्मितीतून आरोग्यसेवा देणे हा आपल्या मूळ ब्रॅण्ड तत्वाशीही कंपनी एकनिष्ठ राहत आहे.

## सॅमसंगकडून भारतात गॅलॅक्सी झेड फ्लिप७ आणि झेड फ्लिप७ एफईवर आकर्षक ऑफर्सची घोषणा

**गुरूग्राम, ९ ऑगस्ट :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज नुकतेच लॉंच करण्यात आलेले गॅलॅक्सी झेड फ्लिप७ व झेड फ्लिप७ एफई या स्मार्टफोन्सवर मर्यादित कालावधीसाठी आकर्षक ऑफर्सची घोषणा केली. या नवीन ऑफर्स, जवळपास १२००० रूपयांची बँक कॅशबॅक किंवा अपग्रेड बोनससह गॅलॅक्सी झेड फ्लिप७ फक्त ९७,९९९ रूपयांमध्ये उपलब्ध असेल. तसेच, गॅलॅक्सी झेड फ्लिप७ एफई फक्त ८५,९९९ रूपयांमध्ये उपलब्ध असेल, जेथे जवळपास १०,०००० रूपयांची बँक कॅशबॅक किंवा अपग्रेड बोनस आहे.



गॅलॅक्सी झेड फ्लिप७ व झेड फ्लिप७ एफई खरेदी करण्याची इच्छा असलेल्या ग्राहकांसाठी डिल अधिक उत्साहित करण्यासाठी बँक कॅशबॅक आणि अपग्रेड बोनस ऑफर्ससोबत २४ महिन्यांचा नो-कॉस्ट ईएमआय पर्याय देखील मिळू शकतो.

सॅमसंगच्या सातव्या पिढीतील फोल्डेबल स्मार्टफोन्सना भारतात अनपेक्षित मागणी मिळाली आहे, जेथे कंपनीने जुलै २०२५ मध्ये गॅलॅक्सी झेड फ्लिप७ व झेड फ्लिप७ एफई लॉंच केल्यापासून पहिल्या ४८ तासांमध्ये या स्मार्टफोन्ससाठी २.१ लाखांहून अधिक प्री-ऑर्डर्सची नोंद केली आहे.

गॅलॅक्सी झेड फ्लिप७ मल्टीमोडल क्षमता असलेला सुसंगत एआय फोन आहे, ज्यामध्ये नवीन फ्लेक्सविंडो आहे. हा स्मार्टफोन सहजपणे खिशामध्ये मावतो, पण सक्षम असून उत्तमरित्या साह्य करतो. या स्मार्टफोनमध्ये गॅलॅक्सी एआयसह नवीन एज-टू-एज फ्लेक्सविंडो, प्रमुख स्तरीय कॅमेरा आणि अत्यंत सुसंगत व प्रख्यात डिझाइन आहे. सर्वोत्तम वॉइस एआयपासून सर्वोत्तम सेल्फी क्षमतांपर्यंत गॅलॅक्सी झेड फ्लिप७ खिशाला परवडणारा सर्वोत्तम सोबती आहे, जो विनासायास परस्परसंवाद आणि दैनंदिन विश्वसनीयतेसाठी डिझाइन करण्यात आला आहे. फक्त १८८ ग्रॅम वजन आणि फोल्ड केला असताना जाडी फक्त १३.७ मिमी असलेला गॅलॅक्सी झेड फ्लिप७ आतापर्यंतचा सर्वात स्लिम गॅलॅक्सी झेड फ्लिप आहे.

गॅलॅक्सी झेड फ्लिप७ मध्ये आकर्षक फ्लेक्सविंडो डिस्प्ले आहे, जो आवश्यक गोष्टींना पुढे आणतो आणि त्वरित मेसेज टाइप करण्याची सुविधा देतो. ४.१-इंच सुपर एएमओएलईडी फ्लेक्सविंडो आतापर्यंत गॅलॅक्सी झेड फ्लिप७ मधील सर्वात मोठी आहे, तसेच एज-टू-एज उपयुक्तता वापरकर्त्यांना कव्हर स्क्रिनवर चित्रे पाहण्याची आणि टास्क करण्याची सुविधा देते. २,०० नीट्स सर्वोच्च ब्राइटनेस असलेल्या फ्लेक्सविंडोला व्हिजन बूस्टरसह अपग्रेड करण्यात आले आहे, ज्यामुळे सूर्यप्रकाशात देखील स्क्रिनवरील चित्र सुस्पष्टपणे दिसते आणि वापरकर्ते कुठेही कनेक्टेड राहू शकतात. मुख्य डिस्प्ले .९-इंच डायनॅमिक एएमओएलईडी २ आहे, जे अत्यंत सुलभ, सर्वोत्तम अनुभवासाठी डिझाइन करण्यात आले आहे.

## डीएसपी म्युच्युअल फंडातर्फे भारतातील पहिला फ्लेक्सिकॅप इंडेक्स फंड सादर

**मुंबई, ९ ऑगस्ट :** डीएसपी म्युच्युअल फंडाने गुंतवणूकदारांसाठी डीएसपी निफ्टी ५०० फ्लेक्सिकॅप क्वालिटी ३० इंडेक्स हा नवीन फंड * बाजारात आणला आहे. हा फंड म्हणजे अल्प खर्चातील पहिले फ्लेक्सिकॅप गुंतवणूक धोरण होय. हे धोरण केवळ दर्जेदार समभाग आणि गतीमान संकेतांच्या (ट्रिगर्स) आधारे अतिशय वेगाने गुंतवणूक यांचा मिलाफ घडवते. भारतात पहिल्यांदा तयार करण्यात आलेल्या फ्लेक्सिकॅप निर्देशांकाची कामगिरी या फंडाच्या वाटचालीत प्रतिबिंबित होणार आहे. तसेच वेळोवेळी बदलत असलेल्या शेअरबाजारात अतिशय आत्मविश्वासाने वाटचाल करण्यास गुंतवणूकदारांच्या मदतीसाठी हा फंड करण्यासाठी तयार करण्यात आलेला आहे.

डीएसपी म्युच्युअल फंडचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ कल्पेन पारेख म्हणाले, चक्रवाढ साध्य करण्यासाठी गुंतवणूकदारांसाठी दोन अटी महत्त्वाच्या आहेत आणि त्या म्हणजे वाजवी मूल्यांकन असताना उच्च दर्जाच्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक करणे, या होय. किंमत आणि वेळेनुरुप गुणवत्ता या घटकात तीव्र बदल होतात. या धोरणानुसार समभाग त्याच्या अल्प मूल्य पातळीवर असताना फंडाचा शुभारंभ करण्यावर आम्ही नेहमी ठाम विश्वास ठेवलेला आहे. म्हणूनच, आम्ही पहिला फ्लेक्सिकॅप इंडेक्स फंड सादर करत आहोत आणि तो विविध बाजार मूल्य असलेल्या ३० उच्च दर्जाच्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक करेल.

डीएसपी म्युच्युअल फंडाच्या पॅसिव्ह इन्व्हेस्टमेंट्स आणि प्रॉडक्ट्स विभागाचे प्रमुख सीएफए अनिल घेलानी म्हणाले डीएसपी निफ्टी ५०० फ्लेक्सिकॅप क्वालिटी ३० इंडेक्स फंड पारदर्शक, नियम-आधारित दृष्टिकोन वापरत गतिमान फ्लेक्सिकॅप वाटप आणि उच्च-गुणवत्तापूर्ण समभागांची निवड या दोन घटकांचा संगम घडवतो. बाजारातील चढउतारामुळे होणाऱ्या कोलाहलापासून दूर राहणे, गुंतागुंत कमी करणे आणि गुंतवणूकदारांना बाजाराच्या विविध चक्रांमध्ये अर्थपूर्णपणे सहभागी होण्यास मदत करण्यासाठी हा फंड तयार करण्यात आलेला आहे.

डीएसपी म्युच्युअल फंडचे मार्केट स्ट्रॅटेजिस्ट आणि प्रॉडक्टस विभागाचे प्रमुख साहिल कपूर म्हणाले, बहुतेक गुंतवणूकदारांना बाजारात गुंतवणूकीसाठी अचूक वेळ साधताना तसेच निधीचे वाटप करण्याचा निर्णय घेताना अनेक अडचणी येतात. फ्लेक्सी-मोमेंटमवर आधारे पुनर्संतुलन आणि शिस्तबद्ध गुणवत्ता चाळणी या दोन्ही घटकांच्या स्मार्ट एकत्रीकरणातून गुंतवणूकदारांना भेडसवणाऱ्या या आव्हानांना या फंडाची रणनीती सहज तोंड देते आणि त्यामुळे गुंतवणूकीला वेग आणि लवचिकता ही दोन्ही वैशिष्ट्ये प्रदान होतात.

या फंडाच्या आधारे डीएसपी कौशल्यपुर्ण, नियम-आधारित, किफायतशीर आणि बाजारातील विविध परिस्थितीत काम करण्यासाठी तयार केलेली धोरणे प्रदान करत गुंतवणूकदारांना डोळ्यासमोर ठेवत नवोपक्रम राबविण्याच्या बाबतीत आपली वचनबद्धता आणखी दृढ करत आहे. डीएसपी निफ्टी ५०० फ्लेक्सिकॅप क्वालिटी ३० इंडेक्स फंडाची नवीन फंड ऑफर (एनएफओ) ८ ऑगस्ट २०२४ रोजी गुंतवणूकीसाठी खुली झाली असून येत्या २२ ऑगस्ट २०२५ ला बंद होणार आहे. फंडाबाबत अधिक माहिती जाणून घेण्यासाठी आणि माहितीपत्रकासाठी गुंतवणूकदारांनी www.dspim.com या संकेतस्थळाला भेट द्यावी.

## एण्ड टीव्हीची अनिता भाबी मथुरेच्या द्वारकाधीश मंदिरामध्ये जन्माष्टमी साजरी करणार!



**मुंबई, ९ ऑगस्ट :** जन्माष्टमी हा भारतातील एक खास सण आहे. हा सण प्रेम, भक्ती व श्रीकृष्णाचा खोडकरपणा दर्शवतो. यावर्षी हा सण १६ ऑगस्ट २०२५ रोजी साजरा करण्यात येणार आहे. या शुभ प्रसंगी एण्ड टीव्हीच्या 'भाबीजी घर पर हैं' मधील अनिता भाबीची भूमिका साकारणाऱ्या विदिशा श्रीवास्तव मथुरेतील श्रीकृष्ण जन्मभूमीला आणि द्वारकाधीश मंदिराला भेट देणार आहेत. जेथे त्या श्रीकृष्णाचा आशीर्वाद घेऊन धन्य होणार आहेत आणि मथुरेतील आध्यात्मिक वातावरणाचा अनुभव घेणार आहेत. द्वारकाधीश मंदिर हे जगत मंदिर म्हणून देखील ओळखले जाते. या मंदिराला एक ऐतिहासिक व आध्यात्मिक महत्व आहे. मथुरेच्या मध्यभागी स्थित या मंदिरामध्ये श्रीकृष्णाची आराधना केली जाते आणि हे मंदिर श्रीकृष्णाच्या सर्वात पुरातन व पूज्यनीय मंदिरांपैकी एक आहे.

आपला आनंद व्यक्त करत विदिशा श्रीवास्तव ऊर्फ अनिता भाबी म्हणाल्या, मी पहिल्यांदाच मथुरेला भेट देणार आहे आणि त्यासाठी खूप उत्सुक आहे. जन्माष्टमीच्या पवित्र प्रसंगी मथुरेला भेट देणे खरोखरंच एक आशीर्वाद आहे. मी नेहमीच भगवान श्रीकृष्णांच्या जन्मस्थळाला भेट देण्याचे स्वप्न पाहिले आहे आणि आता द्वारकाधीश मंदिराची दैवी ऊर्जा पाहणे विशेषतः या आध्यात्मिकदृष्ट्या उत्साही काळात अविश्वसनीयपणे खास आहे. भक्तीभावासह मी पूजेची तयारी करत आहे. जन्माष्टमीला मी भव्य आरती, सुरेखरित्या नृत्यदिग्दर्शित कृष्णलीला आणि शहरामध्ये उत्साहाचे वातावरण आणणाऱ्या झांकी मिरवणुका पाहण्यास खूप उत्सुक आहे. आध्यात्मिक अनुभवाव्यतिरिक्त मथुरेची अद्वितीय संस्कृती आणि पाककृतीचा अनुभव घेण्यास देखील उत्सुक आहे. मी प्रसिद्ध मथुराचे पेढे, माखन-मिश्री प्रसाद आणि शहरातील स्ट्रीट फूड, विशेषतः कचोरी-सब्जी, जिलेबी व बेदाई यांचा आस्वाद घेणार आहे. हा प्रवास भक्ती, शोधन आणि उत्साहपूर्ण वातावरणाने भरलेला असेल. पुढील प्रवासासाठी आशीर्वाद मागण्यासह मी आमच्या सर्व चाहत्यांचे प्रेम माझ्यासोबत घेऊन जात आहे.''

## इंटरनॅशनल कॅट डे निमित्त एण्ड टीव्हीवरील अभिनेत्रींनी त्यांना भेटलेल्या सर्वात मजेदार मांजरींबाबत सांगितले!



**मुंबई, ९ ऑगस्ट :** यंदा इंटरनॅशनल कॅट डे निमित्त अभिनेत्री त्यांच्या मालिकांच्या सेटवर मांजरींसोबत झालेल्या मजेदार भेटीबाबत सांगत आहे, जेथे त्या मांजरी गुपचूप स्नॅक्स चोरत होत्या, पोशाखांवर दिमाखात आराम करत होत्या आणि शूटिंगदरम्यान सीनमध्ये अचानकपणे आल्या.

या अभिनेत्री आहेत प्रियमवदा कांत (लतिका, 'घरवाली पेडवाली'), सोनल पनवार (इन्स्पेक्टर मलायका, 'हप्पू की उलटन पलटन') आणि शुभांगी अत्रे (अंगूरी भाबी, 'भाबीजी घर पर है').

आगामी मालिका 'घरवाली पेडवाली' मधील प्रियमवदा कांत ऊर्फ लतिका म्हणाल्या, ''मांजर बोलू शकले असते तर कदाचित ते म्हणाले असते 'या सेटवर माझे राज्य आहे'. प्रामाणिकपणे सांगायचे तर मी देखील त्यांच्या मताला सहमती दिली असती. माझे नेहमी त्यांची मोहकता, स्वावलंबीत्व व काहीशा गूढ वृत्तीने लक्ष वेधून घेतले आहे. आम्ही एकदा बाहेर शूटिंग करत होतो, एक मांजर कॅमेऱ्याच्या बॅगवर बसली होती, जणू काय तिच्यासाठी ते सिंहासन होते आणि ती त्यावरून हटण्यास तयार नव्हती. आम्ही तिला खायला दिले, तिच्या डोक्यावरून प्रेमाने हात फिरवला आणि मजेदार आवाज देखील काढले, पण ती तिथेच बसून राहिली आणि तिच्या नजरेतून ती सांगत होती की 'ही माझी जागा आहे'. शेवटी, आम्हाला तिला तेथून हटवण्यासाठी खूप मेहनत करावी लागली. रोचक बाब म्हणजे मी एका आठवड्यापूर्वी घरामध्ये बोक्याला आणले होते आणि तो घराचा राजा बनला आहे. आम्ही त्याचे नाव 'शेहनशाह' ठेवले आहे. तो घरामध्ये अनपेक्षितपणे मोहकता व आनंद आणतो, ज्यामुळे मी नेहमी मांजरांचे कौतुक करते.''

मालिका 'हप्पू की उलटन पलटन' मधील सोनल पनवार ऊर्फ इन्स्पेक्टर मलायका म्हणाल्या, ''मला नेहमीच मांजरी खूप रंजक वाटतात. एका क्षणी त्या खेळकर असतात, तर दुसऱ्या क्षणी त्या त्यांच्या जगात पूर्णपणे हरवून जातात. एका शूटदरम्यान एक भटकी मांजर माझ्या जॅकेटवर बसली होती आणि तेथून जात नव्हती. ती माझ्या स्वेटरवर बसली होती, ज्यामुळे मला टीममधील एका सदस्याचा स्वेटर घ्यावा लागला होता! दुसरा प्रसंग असा की आम्ही अतिशय गंभीर सीनचे शूटिंग करत होतो, तेव्हा एक गोंडस छोटी मांजर सीनच्या मध्ये आली आणि मागे जाऊन बसली, जणू तिला कॅमेरा तिच्याभोवती फिरत असल्यासारखे वाटले.

## राशीभविष्य

**मेष :** राजकारणात गुंतलेल्या लोकांना उच्च पद मिळू शकते. धनलाभ होण्याची शक्यता आहे. आजचा दिवस तुमच्यासाठी आनंदाचा असेल. तुम्हाला जास्त मेहनत करावी लागणार नाही. परिस्थिती अनुकूल असेल.

**वृषभ :** आज तुमची काही पूर्वीची प्रलंबित कामे पूर्ण होण्याची शक्यता आहे. कामाच्या ठिकाणी येणारे अडथळे कमी होतील. उत्पन्नाचे स्रोत वाढतील. शिक्षण आणि कृषी क्षेत्रात फायदेशीर संधी मिळतील.

**मिथुन :** आज तुमचे धैर्य आणि शौर्य वाढेल. तुम्ही काही धोकादायक काम करण्यात यशस्वी व्हाल. सैन्याशी संबंधित लोकांना महत्त्वाचे यश मिळेल. व्यवसायात नवीन प्रयोग फायदेशीर ठरतील.

**कर्क :** तुमच्या विचारांना सकारात्मक दिशा द्या. कोणाच्याही प्रभावात येऊ नका. तुमच्या शत्रूंपासून सावध रहा. ते तुमच्या कमकुवतपणाचा फायदा घेण्याचा प्रयत्न करू शकतात.

**सिंह :** आज कामाच्या ठिकाणी अडथळे कमी होतील. उत्पन्नाचे स्रोत वाढतील. व्यवसायीकांचा नवीन व्यवसायात रस वाढेल. सामाजिक क्षेत्रात काम करणाजया लोकांना समन्वय निर्माण करावा लागेल.

**कन्या :** आज नोकरीत बढती मिळण्याची शक्यता आहे. व्यवसायात तुम्हाला नवीन भागीदार मिळतील. तुमच्या व्यवसायाची परिस्थिती सुधारेल. तुम्ही नवीन व्यवसायात व्यस्त राहाल.

**तुळ :** राजकारणात तुम्हाला महत्त्वाचे पद किंवा जबाबदारी मिळू शकते. तुमच्या मुलांप्रती असलेली तुमची जबाबदारी पार पाडली जाईल. निरुपयोगी गोष्टी टाळा. काम आणि व्यवसायातील ताणतणाव संपतील.

**वृश्चिक :** सरकारी मदतीने कोणत्याही महत्त्वाच्या कामातील अडथळे दूर होतील. सुरक्षा क्षेत्रात कार्यरत लोकांना विशेष यश मिळेल. राजकारणात तुमचे स्थान आणि प्रतिष्ठा वाढेल.


**धनु :** आज जमिनीशी संबंधित कामात गुंतलेल्या लोकांना कठोर परिश्रमानंतर यश मिळेल. नोकरीत स्थान बदलण्याची शक्यता आहे. किंवा तुम्हाला स्थान बदलाशी संबंधित चांगली बातमी मिळेल.

**मकर :** आज तुम्हाला जवळचा मित्र भेटेल. कामाच्या ठिकाणी नोकरदारांचा आनंद वाढेल. कुटुंब आणि मित्रांच्या मदतीने व्यवसायातील अडथळे दूर होतील. वडिलोपार्जित संपत्ती मिळण्याचा मार्ग मोकळा होईल

**कुंभ :** नोकरदार लोकांना त्यांच्या गोड स्वभावामुळे आणि गोड बोलण्यामुळे त्यांच्या कनिष्ठांकडून कौतुक मिळेल. आज तुमच्या मनात सकारात्मक विचार जास्त असतील. कामावर लक्ष केंद्रित करा.

**मीन :** परराष्ट्र सेवेशी संबंधित लोकांना महत्त्वाचे यश मिळेल. सरकार आणि सत्तेशी संबंधित बाबींमध्ये तुम्हाला यश मिळेल. वाहन खरेदी करण्याची इच्छा पूर्ण होईल. व्यवसायात नवीन प्रयोग फायदेशीर ठरतील.

## शब्दकोडे क्रमांक २१८७




**आडवे शब्द :-**
१) पाप धुवून टाकणे
६) विड्याच्या पानाची वेल
१०) घोडदळातील एक हुद्दा
१२) माराची उमटलेली खूण
१३) तात्पर्यार्थ
१४) कापडाचा एक प्रकार
१६) कणीदार
१७) टेहेळणी करणारा, गुप्त हेर
१८) च्या पुढे
१९) फक्त, केवळ
२०) कपट
२२) तात्काळ
२३) फुलातील रस शोषून घेणारी
२४) नव्यावे, अलीकडे
२६) धावणे
२७) मागणारा
२८) अवघड, कष्टप्रद त्रासदायक
३१) अक्षरावरील उभी रेघ
३२) भयंकर
३४) कमळातील बी
३८) केस
४०) निर्बुद्ध
४१) जळफळाट, अरेरावी
४२) माघार, झाडावरून आपोआप गळून पडलेले फळ
४४) छोटा खड्डा
४५) बागवान
४६) गर्द लाल रंग
४८) माल साठवून ठेवण्याची जागा
५०) धपाटा
५१) ओवाळून टाकलेली जिन्नस
५३) दिवस
५४) दरारा, वचक
५५) लिंबू पाण्याचे पेय
५८) सडक,
५९) प्रज्वलित, तापलेले
६२) मान्यतेचा शब्द
६३) तयार होत असताना अन्न जळणे
६५) ज्याला वतन मिळाले आहे असा
६८) महाभारताचे लेखक
७०) हवेतील गरमी
७१) माजलेला गर्विष्ठ
७२) दुसऱ्याच्या मनातील भाव, विचार ओळखणारा

**उभे शब्द :-**
२) दुसऱ्यासाठी पैसा खर्च करणे
३) जानकी पती
४) ब्रह्मदेवाचे मानसपुत्र
५) जून, कडक
६) श्रीफळ
७) चटकन
८) एक गळीत धान्य
९) घराचा मागील दरवाजा
११) यशस्वी सूड उगविणे
१३) नवऱ्याची किंवा पत्नीची आई
१४) हसऱ्या चेहऱ्याचा
१५) नवा कोरा
१७) यज्ञोपवीत
२०) देवदर्शनानिमित्त काशीस जाणे
२१) स्टेशन (म)
२३) घाण
२५) स्वतःची इच्छा पूर्ण करून स्वस्थ बसणे, तहान भूक शमविणे (वा.प्र.)
२६) गवंड्याकडची पाण्याची पिशवी
२९) अस्थिर
३०) जिनसांची यादी
३१) माडाच्या पोईतून काढलेले मद्य
३३) माणसाचा जाडेपणा
३५) दिवटी
३६) वस्त्र
३७) टणक, मऊच्या विरुद्ध
३९) महिरप
४१) तमाशातील कलावंत
४३) फुरसत, सवड
४७) वऱ्याचे तांदूळ
४९) चानी
५२) बांगड्यांचा व्यवसाय करणारी जमात
५५) सदोदित
५६) पाहुणचार, सत्कार
५७) वजन, बोजा
६०) पती जिवंत असलेली स्त्री
६१) सरहद्द, सीमा
६३) शपथ
६४) बिल्ला
६६) नमणे, वाकणे, पडते घेणे
६७) गव्हाचे जाडसर पीठ
६९) बारीक दगड

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# घरकुल आरक्षित जागेसाठी ‘ऑगस्ट क्रांती’ दिनी रास्ता रोको

- राजुरा व बेळावासींची 250 घरकुलांची जागा हडपल्याचा आरोप
- 21 ऑगस्टपर्यंत कारवाई न झाल्यास अधिक तीव्र आंदोलनाची चेतावणी





**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी,( दि.9 )** - राजुरा येथील बेळा वासीयांच्या घरकुल आरक्षित जागेवरील अवैध अतिक्रमण तातडीने हटवावे, या मागणीसाठी आज ‘ऑगस्ट क्रांती दिना’निमित्त भव्य रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. जाणता युवा संघटनेचे संस्थापक अन्ना ऊर्फ गिरीश चौधरी यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थ व वेळा वासीयांनी हे आंदोलन केले.

हे आंदोलन राजुरा नाकाङ्कमार्डी रोड हायवेवर पार पडले. आंदोलना दरम्यान वाहतूक 5 किलोमीटरपर्यंत ठप्प झाली होती. मात्र, दवाखान्यात जाणारे रुग्ण, सरकारी परीक्षा देणारे विद्यार्थी, हॉस्पिटलमध्ये कार्यरत कर्मचारी यांना कुठेही अडवण्यात आले नाही. शांततामय मार्गाने ‘भारत माता की जय, ‘इन्कलाब जिंदाबाद’, ‘आमची जागा आम्हाला द्या’ अशा घोषणा देत ग्रामस्थांनी आपली भूमिका ठामपणे मांडली.

### 21 ऑगस्टपर्यंत मुदत

आंदोलकांनी खासदार बळवंत वानखेडे यांच्याशी संपर्क साधला तसेच माजी कॅबिनेट मंत्री व पालकमंत्री यशोमती ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली मागण्या सादर केल्या. 21 ऑगस्ट 2025 पर्यंत अतिक्रमण हटवण्याचा निर्णय न झाल्यास यापेक्षा मोठे आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला. यापूर्वीही गिरीश चौधरी यांच्या नेतृत्वाखाली 30 जानेवारी ते 1 फेब्रुवारी 2025 दरम्यान तीन दिवसीय आंदोलन झाले होते. त्यावेळी अन्नत्याग आंदोलन आणि साखळी उपोषणही करण्यात आले होते. मात्र, अद्याप अतिक्रमण हटवले गेलेले नाही.

### अधिकाऱ्यांना अनेक निवेदने; तरीही कारवाई शून्य

राजूरा वासीयांनी जिल्हाधिकारी अनिल भटकर, तहसीलदार विजय लोखंडे, तसेच कॅबिनेट मंत्री चंद्रकांत बावनकुळे यांना निवेदने दिली होती. 15 जून 2025 रोजीही निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. तरीदेखील, निकिता हुंका पवार व त्यांच्या संस्थेकडून जागा हडपल्याचा आरोप असलेले अतिक्रमण अद्याप कायम आहे.

### मोठ्या संख्येने ग्रामस्थांची हजेरी

आंदोलनात राजूरा व बेळा येथील जवळपास 500 ग्रामस्थ उपस्थित होते. यामध्ये पद्माकर शेळके, अंगुरी पवार, संजीवनी वानखेडे, टेकाडे, शारदा शेळके, चंद्रशेखर पतंगराय, हरीश नांदेडकर, मयलेश चव्हाण, प्रविण मुंजाळे, योगेश मानकर, संगीता, चित्रा, मनोज, राहुल, ऋष्री, वंदेश भोसले, पवार, चव्हाण, विठोरी, मयांक, यमदास, खोडके, अनिकेत व इतर ग्रामस्थांचा समावेश होता.



# वरुड नगर परिषदेच्या कामांवर भ्रष्टाचाराचे सावट

**सिमेंट रस्ते व नाली बांधकामात निकृष्ट साहित्याचा वापर**

## नागरिकांत संताप



*महासागर प्रतिनिधी*
*वरुड,( दि.9 ) - वरुड नगर परिषदेच्या हद्दीत गेल्या काही महिन्यांपासून नागरी सुविधा योजनांतर्गत सिमेंट रस्ते, नाल्या आणि पेव्हिंग ब्लॉक बसविण्याची कामे सुरू आहेत. लाखो रुपयांचा निधी खर्च होत असतानाही या बांधकामांमध्ये उघडपणे निकृष्ट दर्जाच्या साहित्याचा वापर होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.*




### नालीचा वाकडा प्रवाह

नियमानुसार नाली सरळ आणि रस्त्याच्या कडेला असावी; मात्र येथे ती रस्त्यालगत वाकडी-तिकडी बांधल्यामुळे रस्त्याची रुंदी कमी झाली आहे. पावसाळ्यात पाणी साचून वाहतुकीत अडथळा निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

### करदात्यांचा पैसा वाया

स्थानिक रहिवासी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी दोषी कंत्राटदारांवर कारवाई, कामांची गुणवत्ता तपासणी आणि अहवाल सार्वजनिक करण्याची मागणी केली आहे. करदात्यांचे पैसे वाया घालवले जात आहेत, नगर परिषदेने प्रत्यक्ष पाहणी करून गुन्हा दाखल करावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

### प्रशासन मौन का ?

या संपूर्ण प्रकरणात नगर परिषद प्रशासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले असल्याची चर्चा आहे. काही कंत्राटदार आणि अतिक्रमणधारकांना अभय दिल्याचा आरोप होत आहे. नागरिकांनी दोषी अधिकारी आणि कंत्राटदारांवर तातडीने गुन्हा दाखल करण्याचा इशारा दिला आहे.

### गुरुद्वारा परिसरातील कामांवर प्रश्नचिन्ह

मुलताई रोडवरील गुरुद्वारा परिसरातील रस्ते व नाली बांधकामात अंदाजपत्रकातील मोजमापांपेक्षा रुंदी कमी असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. सिमेंटचे प्रमाण अत्यल्प, लोखंडी सळ्या निकृष्ट, तर वाळू-खडीही दर्जाहीन असल्याचे स्थानिकांनी प्रत्यक्ष पाहणी करून निदर्शनास आणले. पायाभूत मजबुती न ठेवता वरवरची लेपणी करून काम उरकल्याचा आरोप आहे.

# संतशिरोमणी सेना महाराज विशेषांकाचा दुसरा प्रकाशन सोहळा

**महासागर प्रतिनिधी**
**वरुड,( दि.9 )**-वारकरी संप्रदायाचे महान संत आणि समतेचे पुरस्कर्ते संतशिरोमणी सेना महाराज यांच्यावर आधारित ‘रिंगण 2025’ या विशेषांकाचा दुसरा प्रकाशन सोहळा वरुड नगरीत 12 ऑगस्ट रोजी संपन्न होणार आहे. या निमित्ताने संपादक सचिन परब यांचे ‘संतविचार आणि समतेचा अधिष्ठान’ या विषयावर विशेष व्याख्यानही आयोजित करण्यात आले आहे. संत नामदेव व ज्ञानेश्वरांच्या काळात वारकरी चळवळीत प्रभावी कार्य करणारे सेना महाराज केवळ अभंगकार नव्हते, तर त्यांनी समतावादी विचारांची मशाल पेटवली. विठ्ठलभक्ती आणि सेवाव्रताने समृद्ध त्यांच्या जीवनकार्याचा नवा पैलू या विशेषांकात उलगडण्यात आला आहे. विशेष म्हणजे, या विशेषांकाच्या पहिल्या आवृत्तीला मोठा प्रतिसाद लाभला असून ती अल्पावधीतच संपली. वाढत्या मागणीमुळे आता दुसरी आवृत्ती प्रकाशित होत आहे. यात महाराष्ट्राबरोबरच मध्य प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश आदी राज्यांतील सेना महाराजांच्या कार्याचा आढावा घेण्यात आला आहे. हा कार्यक्रम 12 ऑगस्ट रोजी सायंकाळी 7 वाजता, श्रीमती जानकीदेवी गांधी विद्यालय, वरुड येथील जागृत सभागृहात होणार आहे.

# अवैध रेती वाहतूक करणारे डंपर थांबवत 7 घरकुल लाभार्थ्यांना वाळू वाटप

### मोर्शीत तहसीलदारांची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.9 )** - मोर्शीत नुकतेच रुजू झालेले तहसीलदार सागर ढवळे यांनी अवैध गौणखनिज तस्करीविरोधात धडक मोहीम सुरू केली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली भरारी पथक तयार करून 7 ऑगस्ट रोजी ही कारवाई करण्यात आली.

मोर्शीहून अमरावतीकडे जात असलेल्या विनानंबरच्या डंपरचा पाठलाग करून शिरखेड ते लेहगाव दरम्यान डंपर



थांबवण्यात आला. मात्र, डंपर चालकाने घटनास्थळीच वाळू खाली करून पळ काढला. यावेळी नायब तहसीलदार चारुदत्त पाटील, मंडळ अधिकारी गिरीपुंजे, ग्राम महसूल अधिकारी मनोहरे आणि भूमिका विधळे उपस्थित होते.

या वाळूचा उपयोग घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू वाटपासाठी करण्यात आला. लेहगाव येथील मिलिंद इंगळे, वासुदेव साबळे, कांता तट्टे, आखतवाडा येथील बशीरखा पठाण, लाडकी बु. येथील कैलास तागडे व तुळशीराम टेकाडे, तसेच शिरखेड येथील सुनिता निकम यांना प्रत्येकी एक ब्रास वाळू वाटप करण्यात आली. ही कारवाई तहसीलदार सागर ढवळे यांच्या तत्पर निर्णयक्षमतेमुळे शक्य झाली असून, अवैध वाळू तस्करांमध्ये यामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घटक अधिकारी व कर्मचाऱ्यांचे घरकुल लाभार्थ्यांनी आभार मानले आहेत.

# राखी मेकिंगमधून व्यवहार ज्ञानाचे धडे

**धानोरा म्हाली जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचा आगळावेगळा उपक्रम**



**महासागर प्रतिनिधी**
**चांदुर रेल्वे,( दि.9 )** - तालुक्यातील धानोरा म्हाली येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत राखीपौर्णिमेनिमित्त विद्यार्थ्यांना व्यवहारज्ञान मिळवून देण्यासाठी अनोखा उपक्रम राबविण्यात आला. शाळेतील स्काऊट-गाईड विद्यार्थ्यांनी स्वत: सुंदर राख्या तयार केल्या व शालेय परिसरात त्यांचे स्टॉल लावून विक्री केली.

या उपक्रमाची कल्पना मुख्याध्यापिका मोहना चोखटकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. शिक्षक वैशाली ढाकुलकर व इतर शिक्षकांच्या सहाय्याने इयत्ता 1 ते 4 आणि 3 ते 7 च्या विद्यार्थ्यांनी मिळून प्रत्येकी 20-25 उत्कृष्ट दर्जाच्या राख्या तयार केल्या. राख्या बनविणे, पॅकिंग करणे आणि दुकानात सजवणे या सर्व गोष्टींचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात आले.

शिक्षण विस्तार अधिकारी हेमलता देशमुख यांच्या हस्ते स्टॉलचे उद्घाटन झाले. उद्घाटन प्रसंगी सरपंच विनाताई निहाटकर, केंद्रप्रमुख सुभाष सहारे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिनेश इंगळे, उपाध्यक्ष कुंदा खानझोडे, मार्गदर्शक सादिक अब्दुल रशीद आणि अनेक मान्यवर उपस्थित होते.गावकऱ्यांनी चिमुकल्यांच्या राख्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पाच रुपयांपासून पंधरा-वीस रुपयांपर्यंतच्या राख्या विक्रीसाठी उपलब्ध होत्या. फक्त दोन दिवसांत हजार रुपयांच्या खर्चातून सतराशे रुपयांची कमाई विद्यार्थ्यांनी केली. गटाने स्टॉल लावल्याने विक्रीत चुरस निर्माण झाली. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना विक्री-खरेदी, स्पर्धा, पॅकिंग, ग्राहकांशी संवाद अशा व्यवहारज्ञानाचे महत्त्वाचे धडे मिळाले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक प्रमोद घाटोळ, संगीता देशभ्रतार, प्रभा पाटणकर, पूजा गुजर, वैशाली कहाळे आणि अर्चना डांगे यांनी परिश्रम घेतले.

# क्रांती दिवस, जागतिक आदिवासी दिन व वृक्षबंधन दिवस साजरा

### स्व. माणिकलालजी गांधी जागृत विद्यालयाचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**
**वरुड, ( दि.9 )** - स्व. माणिकलालजी गांधी जागृत विद्यालय, वरुड येथे 9 ऑगस्ट रोजी क्रांती दिवस, जागतिक आदिवासी दिन आणि वृक्षबंधन दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.



या निमित्ताने संयुक्त राष्ट्रसंघाने जाहीर केलेल्या आंतरराष्ट्रीय आदिवासी दिनाच्या पार्श्वभूमीवर आदिवासी संस्कृती, परंपरा आणि रूढी यांचे संवर्धन करण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमात वर्ग 5 ड चे विद्यार्थी समर्थ खराळकर यांनी मी बिरसा बोलतोय हे एकपात्री नाटक सादर केले. जननायक बिरसा मुंडा यांच्या वेशभूषेत त्यांनी केलेल्या प्रभावी सादरीकरणाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूमिका डवरे (वर्ग 7 क) यांनी भूषविले, तर पाहुणे म्हणून समृद्धी डवरे व सुहाना शेख उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधी आणि बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करून झाली. यावेळी विद्यार्थिनी आर्या अधव, अन्वेशा राऊत, जिया नागवंशी, ज्ञानेश्वरी बेलसरे, पूर्वी बहुरूपी व दर्शनी झोड यांनी क्रांती दिवस आणि आदिवासी दिनाविषयी मनोगत व्यक्त केले. त्याचबरोबर, रक्षाबंधनाच्या निमित्ताने वर्ग 5 ते 7 च्या विद्यार्थिनींनी विद्यालय प्रांगणातील वृक्षांना राख्या बांधून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. या उपक्रमातून सामाजिक व पर्यावरणविषयक जागृती घडविण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन वर्ग 7 क च्या विद्यार्थिनी लक्ष्मी निंभुरकर आणि परिनिता राऊत यांनी केले, तर आभार प्रदर्शन विद्यालयाचे पर्यवेक्षक प्रदीप पाटील यांनी मानले. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन सहायक शिक्षक सत्यपाल धाकडे, सुनील वटके आणि सुनील उईके यांनी केले.

# तिसऱ्या श्रावण सोमवारी उधळणार दोडक्याच्या भाजीचा सुगंध, रोडग्याचा धूर

**बेसखेड्यात बालब्रह्मचारी चंद्रपुरी महाराजांच्या समाधी दर्शनाला भाविकांची रेलचेल**






**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार,( दि.9 )**- चांदूरबाजार तालुक्यातील आळवळण येथील श्री क्षेत्र बेसखेडा गावात दरवर्षी तिसऱ्या श्रावण सोमवारी भक्तिभाव, परंपरा आणि एकजुटीचा सोहळा रंगतो. या दिवशी गावभर दरवळते ती दोडक्याच्या भाजीचा सुगंध आणि रोडग्याच्या धुराची खमंग चव. जिल्ह्यातीलच नव्हे तर राज्यभरातील भाविक हजारोंच्या संख्येने येथे दाखल होतात. नोकरदार, व्यापारी, शेतकरी— कोणताही असो, या दिवशीची उपस्थिती चुकवत नाही.

ही परंपरा आठव्या दशकात बालब्रह्मचारी चंद्रपुरी महाराजांनी सुरू केली. त्या काळी प्लेगच्या भीषण साथीने गाव उद्ध्वस्त होत असताना, महाराजांनी गोसाव्याच्या रूपाने दर्शन देत देवीसमोर प्रार्थना केली. साथ संपल्यास जिवंत समाधी घेण्याचा प्रण त्यांनी केला आणि देवीच्या कृपेने रोग नाहीसा झाल्यावर, श्रावणाच्या तिसऱ्या सोमवारी हनुमान मंदिराजवळ समाधी घेतली. समाधीपूर्वी गावकऱ्यांना दोडक्याची भाजी व रोडग्याचा प्रसाद वाटण्याची परंपरा त्यांनी घालून दिली, जी आजही तितक्याच श्रद्धेने पाळली जाते. महिलांना महाप्रसाद ग्रहण करणे वर्ज्य असले तरी त्या देवीपूजेत सहभागी होतात. गावात मोठ्या उत्सवाऐवजी साध्या पूजनानंतर नैवेद्य अर्पण करण्याची पद्धत आजही कायम आहे. या दिवशी गावकरी एकजुटीने काम करून हजारो भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करतात. हा फक्त प्रसादाचा नव्हे तर श्रद्धा, परंपरा आणि एकोप्याचा अनोखा उत्सव असतो.

### तीर्थक्षेत्राचा विकास



राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या पुढाकाराने श्री क्षेत्र बेसखेडाला तीर्थक्षेत्र ‘ब’दर्जा मिळाला आहे. पाच कोटींच्या निधीतून भव्य मंदिर सभागृह, भक्तनिवास, स्वयंपाकगृह, वाचनालय, व्यायामशाळा, रस्ते व सौंदर्यीकरणाची कामे पूर्ण झाली आहेत.

# रक्षाबंधन उत्सवाने बेघरांच्या चेहऱ्यावर खुलला आनंद





**महासागर प्रतिनिधी**
**परतवाडा,( दि.9 )** - दरवर्षीप्रमाणे यावर्षीही माहेर वुमेन्स मल्टीपरपज फाऊंडेशन व शकुंतला बचाव आंदोलन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने संत गाडगेबाबा बेघर निवारा येथे रक्षाबंधन उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

बेघर निवाऱ्यात राहणारे ज्यांना कोणी नाही किंवा रस्त्यावर भटकंतीदरम्यान सापडलेले वृद्ध, महिला व पुरुष यांच्यासाठी हा दिवस खास ठरला. वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर माहेर फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी वृद्धांना राखी बांधून भाऊ-बहिणीच्या प्रेमाचे नाते दृढ केले.

राखी बांधल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर समाधान व आनंदाचे तेज झळकले. या प्रसंगी शंकुतला सत्याग्रहींनी सर्व बंधूंना राखी बांधून शकुंतला सुरू झालीच पाहिजे ही शपथ घेतली. माहेर फाउंडेशनच्या बहिणींनी प्रेमाची भेट म्हणून वृक्षरोप देऊन पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

कार्यक्रमाला विजय गोंडचवर, वसंत धोबे, राजेश अग्रवाल, डॉ. उमाकांत ठाकरे, रामदास मसने, गजु कोल्हे, योगेश खानझोडे व राजाभाऊ धर्माधिकारी यांसह मान्यवर उपस्थित होते. यावेळी बेघर निवारा व्यवस्थापक आसिफ शेख यांनी निवाऱ्यातील अडचणी व समस्या मांडल्या. शेवटी माहेर फाउंडेशनच्या अध्यक्ष शारदा उईके, सुनिता वैद्य, दीपाली विधळे व दीपा तायडे यांनी सर्वांचे आभार मानले.




# बालांगण

## परिभ्रमण का जाणवत नाही?

तुम्ही मित्र-मैत्रिणींसोबत गोल गोल फिरला किंवा एकमेकांचे हात धरून वेगाने गिरक्या घेतल्या तर काय होते बरं? अगदी बरोबर... आपल्याला चक्कर येऊ लागते. पण तुम्हाला माहिती आहे का की आपण राहतो ती पृथ्वी सूर्याभोवती सुमारे १०० मैल प्रति तास वेगाने फिरत आहे. पण इतक्या वेगाने फिरल्यानंतरही आपल्याला ते कळत नाही. दुसरीकडे, कमी वेगाने काही सेकंद गोल गोल फिरवल्यानंतरही आपल्याला चक्कर येऊ लागते. म्हणूनच पृथ्वीचे फिरणे आपल्याला का कळत नाही हे जाणून घ्यायला हवे.

मुलांनो, आपल्याला पृथ्वीचा वेग जाणवत नाही कारण आपण आणि सभोवतालच्या सर्व गोष्टी एकाच वेगाने फिरत आहोत. म्हणजेच चालत्या ट्रेनमध्ये बसणाऱ्या प्रवाशाला बाहेर पाहेपर्यंत ट्रेनचा वेग कळत नाही, त्याचप्रमाणे पृथ्वीवर आपण देखील त्याच वेगाने फिरत असल्यामुळे काहीही जाणवत नाही.



माहिती असावे

उर्मिला राजोपाध्ये

दुसरे म्हणजे पृथ्वीची गुरुत्वाकर्षण शक्ती आपल्याला पृष्ठभागावर बांधून ठेवते. पृथ्वी अचानक थांबली तर आपण सर्वजण त्याच वेगाने पुढे जाऊ, जसे एखादी कार अचानक थांबते आणि प्रवाशांना धक्का बसतो. परंतु पृथ्वी एका स्थिर वेगाने फिरत असल्याने आपल्याला कोणताही धक्का किंवा बदल जाणवत नाही.

त्याबरोबर पृथ्वीचा आकार प्रचंड असल्यामुळेही तिचा परिभ्रमण वेग मंद वाटतो. म्हणजेच हा वेग ताशी १००० मैल असला तरी तो एका मोठ्या गोलात पसरलेला असल्याने, कोनीय वेग कमी आहे. पृथ्वीचे वातावरण देखील त्याच वेगाने फिरते, म्हणूनच आपल्याला त्याचा वेग जाणवत नाही. वातावरण पृथ्वीसोबत फिरले नसते तर आपल्याला सतत भयंकर वादळी वारे जाणवले असते. मानवी शरीर स्थिरतेसाठी बनलेले आहे. आपल्या कानातील संतुलन राखणारा भाग पृथ्वीच्या गतीशी जुळवून घेतो.

## झाडाच्या जतनासाठी...

दोस्तांनो, सध्या मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होताना दिसते. झाडं तोडल्यामुळे पृथ्वीवरचं तापमान वाढत चाललं आहे. प्रदूषणाचा प्रश्न आ वासून उभा राहिला आहे. शुद्ध हवेसाठी लोकांना मास्क घालून फिरावं लागत आहे. घरांमध्ये हवा शुद्धिकरण यंत्रं बसवली जात आहेत. मात्र झाडं हा वातावरण शुद्ध करणारा नैसर्गिक स्रोत आहे. म्हणूनच काही देशांमध्ये हा हरित ठेवा टिकवून ठेवला जातो. इंग्लंडमधल्या लिव्हरपूलमध्ये एक हजार वर्षांपूर्वीचं ओकचं झाड आहे. हे झाड जपून ठेवण्यासाठी बरेच प्रयत्न केले जात आहेत. हा ओक वृक्ष अजून बरीच वर्षं जगावा यासाठी निधी गोळा करण्यात आला आहे. या झाडावर बरेच पैसे खर्च होत आहेत.



युरोपमध्ये अनोख्या स्पर्धेचं आयोजन केलं जात आहे. या स्पर्धेत झाडं सहभागी होतात. यापैकी एका झाडाला 'ट्री ऑफ द ईयर' हा पुरस्कार दिला जातो. २०२० मध्ये होणाऱ्या 'युरोपियन ट्री ऑफ द ईयर' स्पर्धेत हे ओकचं झाड सहभागी झालं होतं. 'ट्री ऑफ द ईयर' ठरण्यासाठी या झाडाला बरीच मतं मिळणं गरजेचं आहे. ऐतिहासिक महत्त्व असणाऱ्या

जागरुक व्हा

झाडांना या स्पर्धेत सहभागी करून घेतलं जातं. लिव्हरपूलमधला हा ओक वृक्ष ऐतिहासिक ठेवा आहे. म्हणूनच त्याचं जतन करण्यासाठी इथलं प्रशासन बरीच मेहनत करत आहे.




## असा आहे पृथ्वीचा शेजारी

दोस्तांनो, आपल्या सूर्यमालेतला लाल रंगाचा ग्रह म्हणजे मंगळ. या मंगळाबद्दल पृथ्वीवासीयांना प्रचंड कुतूहल आहे. मंगळावर जीवसृष्टी आहे का, याचा शोध लावला जात आहे. भारताच्या इस्रो या अंतराळ संशोधन संस्थेसह अमेरिकेची नासा ही संस्थाही मंगळाच्या पृष्ठभागाचा अभ्यास करत आहे. तुम्हा लहानग्यांचा बालदिन असतो. त्याचप्रमाणे मंगळाचाही खास दिवस आहे. या दिवसाला 'रेड प्लॅनेट डे' असं म्हटलं जातं. २८ नोव्हेंबर हा दिवस 'रेड प्लॅनेट डे' म्हणून पाळला जातो. २८ नोव्हेंबर १९६४ या दिवशी मॅरिनर नावाचं अंतराळयान आकाशात झेपावलं. याच कारणामुळे २८ नोव्हेंबर हा दिवस रेड प्लॅनेट डे म्हणून साजरा होऊ लागला. मंगळाचा पृष्ठभाग खडकाळ आहे. लाल रंगामुळे मंगळाला रेड प्लॅनेट म्हटलं जातं. 'रेड प्लॅनेट डे'ला तुम्ही बरंच काही करू शकता. रात्री

जाणून घ्या


वीणा देशमुख

निरभ्र आकाशाकडे डोळे लावून बसा. तुम्हाला लाल रंगाचा हा ग्रह म्हणजे मंगळ दिसेल. हे शक्य नसेल तर मंगळाबाबत माहिती मिळवा. अंतराळाची माहिती देणारी पुस्तकं वाचा. इंटरनेटवरही तुम्हाला भरपूर माहिती मिळू शकते. मंगळ हा सूर्यमालेतला चौथ्या क्रमांकाचा ग्रह. म्हणजेच पृथ्वीचा शेजारी आहे. त्यामुळे मंगळावर जीवसृष्टी असेल अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



## ऑनलाईन मैत्र टिकवण्यासाठी...

मुलांनो; तुम्ही फेसबुक, इन्स्टाग्रामसारख्या सोशल मीडिया ॲप्सचा वापर करत असाल. यावर तुमचे बरेच फ्रेंड्स असतील. पण काही चुकांमुळे तुमच्या मित्रांची संख्या कमी होऊ शकते.



* अनोळखी लोकांच्या फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नका. हे लोक तुमच्या मित्रांना फ्रेंड रिक्वेस्ट पाठवू शकतात. यामुळे काही लोक तुम्हाला अनफॉलो करू शकतात.


* सोशल साईटवरून मीम्स शेअर करतात. पण या मीम्सचा अनेकांना कंटाळा येतो. त्याऐवजी चांगली माहिती शेअर करा. यामुळे तुमचे फ्रेंड्स टिकून राहतील. शिवाय त्यांची संख्याही वाढेल.

टेक नॉलेज

* सोशल साईट्सवरून वेगवेगळ्या गेम्सच्या रिक्वेस्ट पाठवल्या जातात. पण तुमच्या फ्रेंड्स लीस्टमधला प्रत्येकजण हे गेम्स खेळत असेल असं नाही. अशा रिक्वेस्टना अनेकजण वैतागतात. त्यामुळे शक्यतो अशा रिक्वेस्ट पाठवू नका. तुमची वैयक्तिक माहिती सतत शेअर करू नका. याचा इतरांना कंटाळा येऊ शकतो. तुम्हाला अनफॉलो करू शकतात.

## तमिळनाडूची शान

कोईंबतूरला दक्षिणेचं मँचेस्टर म्हटलं जातं. कोईंबतूर हे तमिळनाडूमधलं तिसऱ्या क्रमांकाचं मोठं शहर आहे. नोय्यल नदीच्या किनारी वसलेलं हे शहर निलगिरी पर्वताच्या पायथ्याशी आहे. इथली स्थानिक देवता कोनियाम्मच्या नावावरून या शहराला कोईंबतूर हे नाव मिळालं. बंगलोर, पुणे या शहरांप्रमाणेच कोईंबतूर हे आयटी हब बनून गेलं आहे. हे वस्त्रोद्योगाचं मोठं केंद्र आहे. इतकंच नाही तर इथे बरीच इंजिनिअरींग महाविद्यालयं आहेत. त्यामुळे कोईंबतूरला शिक्षणाचं माहेरघर म्हटलं जातं. तमिळनाडूच्या जडणघडणीत कोईंबतूरचा मोठा वाटा आहे. या शहराच्या आसपास बरेच धबधबे आहेत. सिरुवनी हा इथला प्रसिद्ध धबधबा आहे. कोईंबतूरची लोकसंख्या २.४ दशलक्ष इतकी आहे. उटी, कुन्नूर, वालपराईसारखी पर्यटनस्थळं कोईंबतूरपासून हाकेच्या अंतरावर आहेत. त्यामुळे या शहरात पर्यटकांची गर्दी झालेली असते.



सफर शहरांची

## नकारात्मकता घालवण्यासाठी...

मुलांनो, विविध कामांसाठी शरीराला ऊर्जेची गरज असते. आपण खात असलेल्या अन्नपदार्थांमुळे शरीराला ऊर्जा मिळते. नियमित व्यायामामुळे आपण तंदुरुस्त होतो. ही असते शारीरिक तंदुरुस्ती. मात्र आपले विचार, भावना आणि लोकांशी साधला जाणारा संवाद आपल्या सर्वांगिण आरोग्यावर परिणाम करत असतो. आपल्या आसपास बरीच नकारात्मकता असते. लोक नकारात्मक विचार व्यक्त करत असतात. मात्र या सगळ्यापासून स्वत:ला लांब ठेवणं खूप गरजचेचं असतं. यासाठी नेमकं काय करता येईल? जाणून घेऊ.



* सतत नकारात्मक बोलणाऱ्या, इतरांचा अपमान करणाऱ्या, आयुष्याबद्दल तक्रार करणाऱ्या माणसांपासून लांब रहा. स्वत:च काही सीमारेषा आखा. तुमच्याकडे करण्यासारखं बरंच काही आहे हे लक्षात ठेवा. या नकारात्मकतेच्या जाळ्यात अडकू नका.

लाईफस्टाईल


आरती देशपांडे

* तुम्हाला प्रोत्साहन देणारा एखादा मंत्र तयार करा. तुमच्या आसपास बरंच काही चुकीचं घडत असतं. पण हे इतरांचे विचार आहेत; माझे नाहीत, मला खूप पुढे जायचं आहे असं घोकत रहा.

* तुमच्या विचारशक्तीला चालना द्या. तुम्ही पांढऱ्या आणि निळ्या रंगाच्या फुग्यामध्ये बसला आहात असा विचार करा. आता दुसऱ्यांचे नकारात्मक शब्द, विचार या फुग्याला आपटून पुन्हा त्यांच्याकडेच जात आहेत. या विचारांचा तुमच्यावर काहीच प्रभाव पडत नाही, असं समजा. यामुळे इतरांच्या विचारांचा तुमच्यावर काहीच प्रभाव पडणार नाही.

* आपल्या घरात किंवा खोलीत बराच कचरा पडलेला असतो. काही वस्तू उगाचच ठेवलेल्या असतात. यामुळे नकारात्मकता वाढत जाते. यासाठी तुमची खोली वेळावेळी आवरा. स्वत:ला ही सवय लावून घ्या. खोलीत उगाचच वस्तूंची गर्दी करू नका. यामुळे तुम्हालाही प्रसन्न वाटेल.

ठिपके जुळवा



## बायोकेमिकल इंजिनिअरींगचा विचार करा

इंजिनिअरींगच्या विविध शाखा आहेत. त्यापैकी एक म्हणजे बायोकेमिकल इंजिनिअरींग. केमिकल इंजिनिअरींग, मायक्रोबायोलॉजी आणि बायोकेमिस्ट्रीच्या अभ्यासासाठी इंजिनिअरींगची ही शाखा तयार करण्यात आली आहे. बायोकेमिकल इंजिनिअर्स सेल्स व्हायरस, प्रोटिन्स तसंच इतर बायप्रोडक्टसच्या विकासासाठी, यांच्या विकासात येणारे अडथळे दूर करण्यासाठी प्रयत्नशील असतात. बायोकेमिकल इंजिनिअरींगअंतर्गत तुम्ही बायोकेमिस्ट्री, बायो आंत्रप्रिनरशीप, बायो प्रोसेस,



एन्व्हायर्न्मेंटल स्टडीजसारख्या विविध विषयांचा अभ्यास करू शकता. या शाखेत प्रवेश घेण्यासाठी तुम्हाला विविध प्रवेश परीक्षा द्याव्या लागतात. पदवी मिळवल्यानंतर तुम्ही मास्टर्स तसंच पीएचडीही करू शकता.

कोण होणार?

बायोकेमिकल इंजिनिअर्स रंग, बायो फ्युअल, अल्कोहोल, स्टेरॉइड्स, एंझाइम्स, बायो फर्टिलायझर्सची निर्मिती करणाऱ्या कंपन्यांमध्ये काम करतात.

## वडा होतो कुरकुरीत

गरम सांभारात बुडवलेला कुरकुरीत वडा... अहाहा! विचार केला तरी तोंडाला पाणी सुटते, नाही का? मुलांनो, हा फक्त एक चविष्ट नाश्ता नाही तर दक्षिण भारताची ओळखही आहे. तुम्हीही या पदार्थाचा असंख्य वेळा आस्वाद घेतला असेल. पण मेदूवड्याच्या मध्यभागी गोल छिद्र का असते हे तुम्हाला माहिती आहे का? मित्रांनो, हे फक्त डिश सुंदर दिसण्यासाठी नाही हे प्रथम जाणून घ्या.



वाचा तर खरं

पंकजा देव

वड्याचे पीठ खूप जाड असते. ते छिद्राशिवाय गोल बनवले तर बाहेरील थर लवकर शिजेल आणि कुरकुरीत होईल, परंतु असे केल्यास आतील भाग कच्चा राहतो. तो नीट शिजत नाही. छिद्रामुळे गरम तेल वड्याच्या आतील पृष्ठभागावर सहजपणे पोहोचू शकत असल्यामुळे वडा आतून आणि बाहेरून समान पद्धतीने शिजतो.

वडा तेलात तळला जातो तेव्हा छिद्रांमुळे तो सर्व बाजूंनी कुरकुरीत होतो. आतूनही तेलाच्या संपर्कामुळे वड्याची पोत खूप कुरकुरीत होते. छिद्र नसतील तर वडा बाहेरून कुरकुरीत असला तरी आतून मऊ राहू शकतो. तसेच तळल्यानंतर वडा तेलातून बाहेर काढला जातो. असे करताना छिद्रांमुळे अतिरिक्त तेल सहजपणे बाहेर पडते आणि वडा कमी तेलकट होतो. खाण्यास हलकाही वाटतो. वडा चिकटही होत नाही.

वड्यातील छिद्राचा आणखी एक फायदा म्हणजे तुम्ही सांभार किंवा चटणीमध्ये वडा बुडवता तेव्हा सांभार आणि चटणीची चव छिद्रातून वड्याच्या आत पोहोचते आणि ही डिश अधिक रुचकर लागते.

### दोस्त हे मस्त

#### प्लॅटिपस पेरी



छोट्यांनो, प्लॅटिपस पेरी हा अनोखा प्राणी आहे. त्याची चोच बदकासारखी असते. त्याचे पायही विचित्र असतात. हा प्राणी दिसायला खूपच विचित्र असतो. प्लॅटिपस पेरी नर विषारी असतात. हा प्राणी जमिनीसोबतच पाण्यातही रहातो. या प्राण्यांना पोहायला खूप आवडतं. पायांच्या विशिष्ट रचनेमुळे त्यांना पाण्यात पोहणं सोपं होतं. हा प्राणी पाण्यात शिकार करतो. ऑस्ट्रेलियाच्या २० सेंटच्या नाण्यावर प्लॅटिपसचं पेरीचं चित्र आहे.

### खादाडी


#### मस्त स्ट्रॉबेरी क्रॅकर

दोस्तांनो, तुम्हाला स्ट्रॉबेरी आवडत असेल. या आंबटगोड फळात भरपूर पोषक घटक असतात. म्हणूनच तुम्ही स्ट्रॉबेरीपासून छान छान पदार्थ बनवू शकता. स्ट्रॉबेरी क्रॅकर्स हा पदार्थ खूप मस्त लागेल. स्ट्रॉबेरी क्रॅकर्स बनवण्यासाठी दोन स्ट्रॉबेरी, दोन मोठ्या आकाराची बिस्किटं आणि दोन चमचे फ्रेश क्रीम असं साहित्य घ्या. स्ट्रॉबेरीचे तुकडे करा. त्यात फ्रेश क्रीम घाला. आता हे मिश्रण एका बिस्किटावर पसरा. त्यावर दुसरं बिस्किट ठेवा. तुमचं स्ट्रॉबेरी क्रॅकर तयार आहे!



### स्टडी टिप्स

#### उद्दिष्ट ठरवा



छोट्यांनो, कोणत्याही उद्दिष्टाशिवाय केलेला अभ्यास लक्षात रहात नाही. त्यामुळे एकाच दिवशी वेगवेगळ्या विषयांचा अभ्यास करण्यापेक्षा एका विषयाची निवड करून तयारीला लागा. एका विषयाचा किती अभ्यास करायचा हे ठरवा. एक उद्दिष्ट ठरवा. आज दोन धडे पूर्ण करायचे आहेत, असं ठरवून अभ्यासाला लागा. यामुळे हे दोन धडे तुमच्या नीट लक्षात राहतील.

### योगा टाईम

#### लाभ त्रिकोणासनाचे



योगासनांमुळे ताणतणाव कमी व्हायला मदत होते. त्रिकोणासन हे असंच एक आसन आहे. यामुळे पाठीचा कणा बळकट होतो. विविध दुखणी कमी होतात. त्रिकोणासन केल्याने वजनही कमी होतं. हे आसन थोडं कठीण असलं तरी याचे बरेच लाभ आहेत. त्यामुळे त्रिकोणासन नियमितपणे करायला हवं.

# भाजपकडून जाती-धर्मात संघर्षाची पेरणी

## रोहित पवार यांचा आरोप : 'स्थानिक'च्या निवडणुकीनंतर लाडकी बहीण योजना बंद होण्याचा दावा

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :** भाजपकडून समाजात जाती-धर्मांत संघर्षाची पेरणी होत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी शनिवारी केला.

भाजपने मुंबई महापालिकेची निवडणूक डोळ्यांपुढे ठेवून मराठी - अमराठीचा वाद निर्माण केला. भाजपचे लोक जाती-धर्मांमध्ये संघषार्ची पेरणी करत असून, आपल्याला त्याविरोधात लढावे लागणार आहे, असे ते म्हणालेत. यावेळी त्यांनी महायुती सरकारची महत्त्वकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना स्थानिक स्वराज्य निवडणुकीनंतर बंद होण्याची शक्यताही व्यक्त केली.

शरद पवार यांच्या उपस्थितीत शनिवारी नागपूर येथून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या मंडल यात्रेला सुरुवात झाली. ही यात्रा पुढील ४० दिवस राज्यातील विविध भागांतून जाणार आहे. यावेळी बोलताना रोहित पवार यांनी भाजपवर सडकून टीका केली.

ते म्हणाले, मुंबई महापालिकेच्या निवडणुकीच्या तोंडावर भाजपने मराठी विरुद्ध अमराठी वाद निर्माण केला. उर्वरित महाराष्ट्रातही त्यांनी मराठा विरुद्ध ओबीसी वाद तयार केला. इतरही अनेक राज्यांमध्ये त्यांनी जाती-पातींमध्ये असेच वाद निर्माण केले. सोयाबीन, कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान झाले, तेव्हा नुकसान झालेल्या शेतकऱ्यांमध्येही भाजप जात व धर्म पाहणार का? शेतकरी आत्महत्यांमध्येही जात व धर्म पाहिले पाहिजे का? भाजपाचे लोकं जातीधर्मात संघर्षाची पेरणी करत आहेत. आपल्याला त्याविरोधात लढा द्यायचा असल्याचे ते म्हणाले.



### लाडकी बहीण योजना बंद होणार...

रोहित पवार यांनी यावेळी महायुती सरकारची महत्वकांक्षी लाडकी बहीण योजना बंद होणार असल्याचाही दावा केला. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत आतापर्यंत २४ लाख महिलांची नावे कापली गेली आहेत. हे लोक फक्त स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपर्यंत वाट पाहणार आहेत. त्यानंतर कदाचित ही योजना बंदही केली जाईल, असे ते म्हणाले. राज्यात विनयभंग व बलात्काराच्या घटना देशात सर्वाधिक घडत असल्याचे नमूद करत त्यांनी यावेळी शरद पवारांनीच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पहिल्यांदा महिला आरक्षण आणल्याचाही दावा केला.

### संतोष देशमुख हिंदू नव्हते का?

रोहित पवार यांनी यावेळी बीड जिल्ह्यातील संतोष देशमुख व महादेव मुंडे हत्याकांडावरही भाष्य केले. ते म्हणाले, महादेव मुंडे यांची हत्या झाली. ते कोणत्या समाजाचे होते? ते ओबीसी समाजाचे होते. अनेक महिने त्यांची पत्नी न्याय मागत होती. पण न्याय मिळाला नाही. सामान्य लोकांनी हा मुद्दा हातात घेतला तेव्हा १८ महिन्यांनंतर मुख्यमंत्र्यांना जाग आली. महादेव मुंडे ओबीसी नव्हते का? ते हिंदू नव्हते का?

संतोष देशमुख यांच्या बाबतीतही असेच झाले. त्यांच्याही कुटुंबाला अजून न्याय मिळाला नाही. स्थानिक लोकांनी मुद्दा हातात घेतला तेव्हा सरकारला जाग आली. मग संतोष देशमुख हिंदू नव्हते का? असा प्रश्न रोहित पवार यांनी या प्रकरणी हिंदू - मुस्लिमचे कथित राजकारण करणाऱ्या भाजपला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करताना उपस्थित केला.

# यात्रेच्या माध्यमातून सत्याची जाणीव करून देणार

**प्रदेशाध्यक्ष शशीकांत शिंदे यांचे विधान**



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ९ :** लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा दनदणीत विजय झाला होता. त्यानंतर विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्यावर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे अनेक नेते पक्षाला रामराम करून राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गट अथवा भाजपसह महायुतीतील पक्षांमध्ये प्रवेश घेत आहे. या पक्षांतरावर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशीकांत शिंदे यांनी नागपुरात भाष्य केले.

प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे नागपुरात प्रसिद्धी माध्यमांशी बोलतांना म्हणाले, आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संस्थापक व राष्ट्रीय नेते शरद पवार यांच्या उपस्थितीत विदर्भात ओबीसी मंडल यात्रा सुरू होत आहे. आम्ही सर्व पुरोगामी विचारांचा महाराष्ट्र उभा करण्याचा प्रयत्न करत आहोत. ही सुरुवात आहे. विदर्भ हा आधीपासूनच राष्ट्रवादीच्या विचारांचा राहिला आहे.

सध्या केंद्र आणि राज्यातही सत्तांतर झाले आहे. त्यानंतरही विदर्भ राष्ट्रवादी विचारांच्या पाठीमागे उभा राहिला आहे. लोकसभा निवडणूकीत ते दिसून आले आहे. आज अनेक पक्षाचे लोक सोडून गेले तरी नवीन कार्यकर्ते नवीन पक्ष उभारणी करणार आहे. आम्ही पुरोगामी महाराष्ट्राची ओळख या माध्यमातून दाखवणार आहोत.

ओबीसी समाजासाठी मंडल आयोगाची अंमलबजावणी राज्यात शरद पवार यांनीच सुरू केली होती. सध्या राज्यात वेगवेगळे भाषावाद आणि जातीयवाद निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. या मंडल यात्रेतून समाजातील शेवटच्या व्यक्तीलाही आम्ही राज्यातील सत्य परिस्थितीची जाणीव करून देणार असल्याचेही शिंदे यांनी सांगितले.

राज्यकर्त्यांनी कुठेतरी समजदारीची भूमिका घ्यावी. एखाद्या वेळेस आमोरासमोर आल्यावर कार्यकर्त्यांचा संघर्ष टाळण्याचा प्रयत्न करण्याची गरज आहे. एकमेकाला आव्हान देण्याचा प्रयत्न होत असेल आणि ते सरकार कडून होत असेल तर त्याची काळजी घेणे आवश्यक आहे.

**स्थानिक नेत्यांना अधिकार**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत आम्ही स्थानिक नेत्यांना अधिकार दिले आहेत. आम्ही प्रयत्न करतोय महाविकास आघाडी म्हणून निवडणूकीला समोर जावे म्हणून. महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने लोकसभेत लोकांनी ऐतिहासिक मताने निकाल दिला आहे. विधानसभेत त्याची जाणीव झाल्यामुळे राहुल गांधींनी सांगितल्याप्रमाणे विधानसभेला मतांची चोरी झाली. त्याच पद्धतीने या महाराष्ट्रात मताचे विभाजणी न होता भविष्यकाळात चांगल्या पद्धतीने महाराष्ट्रातून हे सरकार बाजूला काढण्यासाठी आम्ही प्रयत्न करू, असेही शशीकांत शिंदे म्हणाले.

# राष्ट्रीय शिक्षण परिषदेचा अहवाल शरद पवार यांना सादर



■ **महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. ९ :** यशवंतराव चव्हाण जिल्हा केंद्र नागपूर यांच्याद्वारे २० एप्रिल रोजी घेण्यात आलेल्या राष्ट्रीय शिक्षण परिषदेचा अहवाल नागपूर केंद्राच्या पदाधिकाऱ्यांनी खासदार शरदचंद्र पवार यांना नागपूर भेटीत सादर केला.

यशवंतराव चव्हाण जिल्हा केंद्र नागपूर यांच्यातर्फे एप्रिल महिन्यात नागपूर येथे राष्ट्रीय शैक्षणिक परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. तीन सत्रात झालेल्या एका दिवशीय शिक्षण परिषदेला देशातील नामवंत शिक्षण तज्ञांनी मार्गदर्शन केले.

केंद्र शासनाने जाहीर केलेल्या नवीन शैक्षणिक धोरणावर शिक्षण तज्ञांनी भूमिका विशद केल्या विदर्भात पहिल्यांदाच अशा परिषदेचे आयोजन केल्या गेले शेकडो शिक्षकांनी या परिषदेत उत्स्फूर्त सहभाग घेतल्याने परिषद यशस्वी झाली होती.

त्या परिषदेचा संपूर्ण अहवाल यशवंतराव चव्हाण सेंटरचे केंद्रीय अध्यक्ष म्हणून खासदार शरदचंद्र पवार यांना नागपूर केंद्राचे अध्यक्ष महेश बंग यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळाने भेट घेऊन सादर केला. यावेळी राजाभाऊ टाकसांडे, कोमल ठाकरे, डॉ अभय माहांकाळ, अनिल इंदाने, रवींद्र देशमुख, उल्हास मोगलेवार, निलेश खांडेकर उपस्थित होते.

# केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम आज



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :** केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम रविवार, दि. १० ऑगस्ट २०२५ रोजी आयोजित करण्यात आला आहे.

खामला चौकाजवळील ज्युपिटर शाळेच्या बाजूला मा. मंत्री महोदय यांच्या जनसंपर्क कार्यालयात सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत हा कार्यक्रम होईल. या वेळेत मंत्री महोदय नागरिकांची निवेदने स्वीकारतील. मंत्री गडकरी नागरिकांना व्यक्तिशः भेटतील आणि त्यांच्याशी संवाद साधतील. नागरिकांनी आपल्या समस्या, अडचणी, मागण्या लेखी स्वरुपातच (आवश्यक कागदपत्रे जोडून) आणाव्यात. तसेच आपली लेखी निवेदने मा. मंत्री महोदयांना द्यावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. त्यानंतर दुपारी १ ते २ या कालावधीत गडकरी आपल्या जनसंपर्क कार्यालयात भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना भेटतील.

# खालिद का शिवाजी चित्रपटावर बंदी घाला

## हिंदू जनजागृती समितीची मागणी : जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर

■ **महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ९ :** खालिद का शिवाजी या आगामी मराठी चित्रपटावर बंदी घालण्याची मागणी हिंदू जनजागृती समितीने केली आहे. या चित्रपटात छत्रपती शिवाजी महाराजांविषयी ऐतिहासिकदृष्ट्या असत्य, विकृत आणि भ्रामक माहिती असल्याच समितीचे म्हणणे आहे.

याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले. त्यांच्यावतीने नायब तहसीलदरांनी निवेदन स्वीकारले.

याप्रसंगी राष्ट्रभक्त अधिवक्ता समितीच्या ॲड. दीपाली जानोरकर,ॲड. राधा मिश्रा, ॲड. लक्ष्मी दांदळे,ॲड. सुनीता कपिले,ॲड. मंजू सावरकर, ॲड. रामदास कपिले, ॲड. मुकुंद जालनेकर,अभिमन्यू नळकांडे, मुक्तेश्वर पांडे,ॲड. श्रुती भट उपस्थित होते.

# तिबेटी महिला संघटनेच्या भगिनींनी बांधली भागवतांना राखी







■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :** रक्षाबंधनाच्या शुभ मुहूर्तावर, प्रादेशिक तिबेटी महिला संघटना आणि भारत तिबेट सहकार्य चळवळीच्या बहिणींनी आरएसएस सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांना राखी बांधली. राष्ट्रीय सेविका समिती आणि दिशा-३० च्या बहिणींनीही राखी बांधून त्यांना शुभेच्छा दिल्या.

तिबेट कॅम्पचे सेटलमेंट ऑफिसर तेन्झिन त्सांगपा यांनी डॉ. मोहन भागवत यांना १४ वे दलाई लामा यांनी लिहिलेले व्हॉइस ऑफ व्हॉइसलेंस हे पुस्तक भेट दिले. या दरम्यान, प्रादेशिक तिबेटी महिला संघटना आणि भारत-तिबेट सहकार्य चळवळीकडून भगवान गौतम बुद्धांचा थांगका देखील सादर करण्यात आला. या कार्यक्रमात, तिबेटी महिला संघटनेच्या अध्यक्षा क्रुंगा डिकी, टीडब्लूए सदस्य त्सुत्रिम, कुनसांग पाल्मो, मिग्मार चोदोन, भारत तिबेट सहकार्य चळवळीच्या लिपाक्षी माने, संघटनेचे संरक्षक अशोक मेंढे आणि इतर सहकारी उपस्थित होते.

## १०० कोटींचा निधी तरीही सुविधांची वाणवा

# पालकमंत्र्यांनी काढली खरडपट्टी!



■ **महासागर प्रतिनिधी यवतमाळ, दि. ९ :** येथील वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात विविध प्रकारच्या सुविधा आपण उपलब्ध करुन देतो आहे. पालकमंत्री झाल्यापासून आतापर्यंत जवळपास १०० कोटीपर्यंतचा निधी देण्यात आला आहे. तरीही, रुग्णाच्या अडचणी, मिळणाऱ्या सुविधांबाबत वारंवार तक्रारी येतात, ही गंभीर बाब असल्याचे सुनावत मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांनी वैद्यकीय महाविद्यालय प्रशासनाची कानउघाडणी केली.

वैद्यकीय महाविद्यालयाच्या सभागृहात त्यांनी वैद्यकीय महाविद्यालयाचा आढावा घेतला. महाविद्यालयात कार्यरत डॉक्टरांनी रुग्णांना अधिक चांगली सेवा दिली पाहिजे. वरिष्ठ डॉक्टरांनी स्वतः ओपीडीला उपस्थित राहुन रुग्ण तपासणी करावी, असे निर्देश पालकमंत्री संजय राठोड यांनी यावेळी दिले.

वैद्यकीय महाविद्यालय वसंतराव नाईक साहेबांच्या नावाने आहे. जिल्ह्यासह आजूबाजूच्या जिल्ह्यातून देखील मोठ्या प्रमाणावर रुग्ण येथे येतात. त्यामुळे येथे अत्याधुनिक सुविधा उपलब्ध होण्यासाठी मागील काळात वेगवेगळ्या योजनांमधून मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करुन दिला. भविष्यातही महाविद्यालयाच्या सुविधांसाठी निधीची कमतरता पडणार नाही. महाविद्यालयाचे स्थानिक स्तरावरील प्रश्न सोडवू, इतर विषयांसाठी राज्यस्तरावर पाठपुरावा करणार असल्याचे पालकमंत्री म्हणाले.

वैद्यकीय महाविद्यालयाला अत्याधुनिक एमआरआय मशिन उपलब्ध करुन देण्यात आली आहे. आवश्यक बाबींची पूर्तता करुन मशिन या महिनाअखेर सुरु करावे. रात्रीच्या वेळी शवविच्छेदन होत नसल्याने मृत व्यक्तींच्या नातेवाईकांची मोठी अडचण होते, त्यामुळे सायंकाळी ६ नंतर देखील शवविच्छेदन करण्यात यावे. तसेच आठवड्याच्या आत शवविच्छेदन अहवाल उपलब्ध करुन द्यावा. दिव्यांग मंडळ आणि वैद्यकीय मंडळातील अधिकारी, डॉक्टरांची यादी दर्शनी भागावर लावण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी केल्या.

महाविद्यालयातील ज्या विभागांचे पोस्ट ग्रॅज्युएशन बंद झाले आहे, ते सुरु करण्यासाठी आवश्यक प्रस्ताव सादर करावे. महाविद्यालयाला उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सर्व यंत्रसामुग्रीचा पुरेपूर वापर झाला पाहिजे. महाविद्यालयात बीएससी नर्सिंग व जीएनएम अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी शासनास सादर केलेल्या प्रस्तावांचा पाठपुरावा करु, असे पालकमंत्र्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी महाविद्यालयातील स्वच्छता, सुरक्षा, रुग्णांचा पोषण आहार, सिकलसेल रुग्णांसाठी उपलब्ध सुविधा, डॉक्टर व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे, महाविद्यालयाचे दैनंदिन कामकाज आदींचा सविस्तर आढावा घेतला.

बैठकीनंतर पालकमंत्री संजय राठोड यांनी महाविद्यालय व तेथील विविध सुविधांची पाहणी केली. त्यात नवजात मुलांना अतिदक्षता कक्ष, अतिदक्षता बालरोग कक्ष, महिला विभागासाठी तयार करण्यात आलेले शस्त्रक्रियागृह, नव्याने बांधण्यात आलेला एमआरआय कक्ष, सीटी स्कॅन कक्ष, बाह्यरुग्ण विभाग, शल्यक्रिया अतिदक्षता विभाग आदींची पाहणी केली.

खनिज विकास व जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून उभारण्यात आलेल्या सुविधांची देखील त्यांनी यावेळी पाहणी केली. यावेळी जिल्हाधिकारी विकास मीना, जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.गिरीष जतकर, वैद्यकीय अधीक्षक डॉ.सुरेंद्र भुयार, उपविभागीय पोलिस अधिकारी दिनेश बैसाने व अधिकारी उपस्थित होते.

### कारच्या छतावर कबूतरांना गुप्त मेजवानी

■ **मुंबई, दि. ९ :** कोर्टाच्या आदेशानंतर मुंबईत कबूतरखाने बंद झाले, पाट्या उतरल्या, खाद्यपात्रं हटवली पण कबूतरांना धान्य टाकण्याचा मोह अजूनही सुटलेला नाही. रस्त्याच्या कडेला कार उभी करून तिच्या टपावर धान्य पसरवून कबुतरांना खावू घालणे सुरू असल्याचे दिसून आले . कोर्टाच्या आदेशाची अशाप्रकारे अवहेलना केली जात आहे.

# भंडारा पोलीस दळणवळण आणि माहिती तंत्रज्ञान विभागाची राज्यात प्रशंसा





■ **महासागर प्रतिनिधी, भंडारा,दि. ९ :** महाराष्ट्र राज्य पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान विभागाच्या राज्यस्तरीय मुल्यांकन स्पर्धेत भंडारा जिल्ह्याने उल्लेखनीय यश मिळविले असून राज्यात पूर्व विभागात दुसरे कमांकावर आपले स्थान निश्चित केले आहे.

अपर पोलीस महासंचालक व संचालक पोलीस दळणवळण, माहीती तंत्रज्ञान व परिवहन, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली झालेल्या मुल्यांकनात भंडारा विभागाने आपले तांत्रिक कौशल्ये, नव्या तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि प्रशासकीय सुसूत्रतेमुळे ही ओळख निर्माण केली आहे.

भंडारा जिल्हा पोलीस दलाने तांत्रिक क्षेत्रात केलेल्या विविध उपाययोजनामुळे हा मान मिळविता आला आहे. निवडणुकाच्या पार्श्वभुमीवर अत्याधुनिक उपकरणांची खरेदी, जिल्ह्यातील शेंडो बुथची संख्या कमी करून बिनतारी दळणवळण सुधारण्यात आले. भागडी, तुमसर येथे तात्पुरते रिपिटर उभारणी करून अखंड दळणवळण साखळी निर्माण करण्यात आली.

ाेलनेट फेज - २ वरिल तांत्रीक अडथळे दुर करून यंत्रणा पुन्हा कार्यान्वित करण्यात आलेली आहे. स्थानिक पातळीवर संच व रिपीटर

### पूर्व विभागात दुसरे स्थान

तसेच विजेरीची खरेदीने बरीच तांत्रिक अडचण दूर करण्यात आलेली आहे. जिल्हयात असलेले एकमेव रिपीटर भिलेवाडा येथे वातानुकुलित यंत्रणा बसविण्यात आलेली आहे. नवीन रिपीटर भागडी येथे उभारणीबाबत तांत्रिक तपासणी झाली असून प्रशासकीय पुर्तता करण्यात आलेली आहे. पोलीस मुख्यालयात नव्याने निर्माण केलेले दिशा प्रकल्पाला लागणारे तांत्रिक साहित्याबाबत वेळीच कार्यवाही करीत पुर्तता करण्यात आलेली आहे.

सार्वत्रिक लोकसभा तसेच विधानसभा निवडणुकीचे दरम्यान बाहेरील राज्यातून प्राप्त झालेले संच तसेच वॉकीटॉकीला लागणारे भंडारा जिल्हयातील क्षम्रतेची प्रोग्रामींग करून जिल्हयातील दळणवळण प्रस्थापित करण्यात आलेले होते.

या सर्व उपक्रमाच्या यशस्वी अमंलबजावणी मुळे भंडारा विभागाला पुर्व विभागातील १७ घटकापैकी द्वितीय कमांक प्राप्त झाला आहे. ही जिल्ह्याकरिता अत्यंत अभिमानास्पद बाब ठरलेली आहे. या अनुषंगाने अपर पोलीस महासंचालक व संचालक पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन दिपक पांडेय यांचे हस्ते पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान भंडारा घटकाचे पोलीस निरीक्षक रविंद्र सुधाकर मांजळे यांना एका विशेष कार्यक्रमात प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले.

पोलीस दळणवळण विभागाच्या या उल्लेखनिय कामगीरीबाबत जिल्हा पोलीस अधीक्षक नूरुल हसन यांनी अधिकारी व अंमलदार यांचे कौतुक केले आहे. या विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले.